मराठी अस्मितेचा आवाज बुलंद करण्याचे कार्य गेली २७ वर्षे करणारे 'दैनिक वृत्तमानस' आता घरोघरी पोचवण्याचे काम आम्ही करणार आहोत. वाचकांना आमच्या लोकप्रिय दैनिकाची प्रत उपलब्ध होत नसेल तर या दूरध्वनींवर संपर्क साधावा.
**दातार अँड सन्स न्युज पेपर डिस्ट्रिब्युटर्स**
भ्रमणध्वनी - ८६५५१९४४५२, ८५९१६६२६१६,९८६७३०८०६३

मराठी अस्मितेचा बुलंद आवाज.
https://epapervrittamanas. in/

# वृत्तमानस



ठाण्यातील आनंद आश्रमात शिंदे शिवसेनेकडून नोटांची उधळण पान 8

Email : vrittamanas1@gmail. com
मुंबई/ पालघर | मुंबई, रविवार, १५ सप्टेंबर २०२४ | वर्ष- २९ | अंक - ८६ | पाने- ८ | आर. एन. आय क्र. - ६५६०९/९६ | किंमत : ३ रुपये

# बहिणींच्या डोळ्यातील आनंद सांगतोय, 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' सुपरहिट - मुख्यमंत्री

प्रतिनिधी
धाराशिव

मला मुख्यमंत्रीपदापेक्षा भाऊ हा शब्द जिव्हाळ्याचा वाटतो. मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण अभियानाच्या आजच्या कार्यक्रमात अतिशय उत्साहाने सहभागी झालेल्या लाडक्या बहिणींच्या डोळ्यातील आनंद पाहून मनाला अतिशय समाधान मिळत आहे. त्यांच्या डोळ्यातील हा आनंद म्हणजे या योजनेच्या यशस्वीतेची पावती आहे. ही योजना 'सुपरहिट' ठरल्याचे यातून स्पष्ट होत असल्याची भावना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केली.परंडा येथे आज



महिला सशक्तीकरण अभियानांतर्गत मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना वचनपूर्ती कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी पालकमंत्री प्रा. डॉ.तानाजी सावंत, आमदार ज्ञानराज चौगुले,माजी आमदार सुजितसिंह ठाकूर, जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओंबासे यांची प्रमुख उपस्थिती होती.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरु केल्यानंतर अनेकांनी याविषयी शंका उपस्थित केल्याचे सांगून मुख्यमंत्री शिंदे पुढे म्हणाले, महिला सक्षम तर देश पान 7 वर

### सावंतांच्या कार्यक्रमाकडे दोन्ही उपमुख्यमंत्र्यांसह महिला व बालविकास मंत्र्यांनीही फिरवली पाठ

*बेताल वक्तव्याने महायुतीमध्ये नाराजीची ठिणगी पाडणाऱ्या पालकमंत्री तानाजी सावंत यांनी आयोजित केलेल्या लाडक्या बहिणींच्या कार्यक्रमाकडे दोन्ही उपमुख्यमंत्र्यांसह महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी पाठ फिरवली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावर पांघरुण घालण्याचा प्रयत्न केला असला तरी दोन्ही उपमुख्यमंत्री, महिला व बालविकास मंत्र्याची अनुपस्थिती महायुतीमधील नाराजी उघड करणारी आहे. कार्यक्रम पत्रिकेत सर्वांची नावेही होती. मात्र, आज केवळ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हेच उपस्थित राहिले. या कार्यक्रमाकडे दोन्ही उपमुख्यमंत्री, महिला व बालविकास मंत्र्यानी पाठ फिरवली. पालकमंत्री सावंत यांनी काही दिवसांपूर्वीच आम्ही मंत्रिमंडळ बैठकीत राष्ट्रवादी काँग्रेसच्या लोकांच्या मांडीला मांडी लावून बसत असलो, तरी बाहेर आलो की आम्हाला उलटी होते. तसेच लोकसभा निवडणुकीवेळी मनासारखा उमेदवार नसल्याने तुमच्याकडे मते मागण्यासाठी आलो नाही, असे म्हणत गद्दारी केल्याचे कबूल केले होते.*





श्री साई मित्र मंडळ (ट्रस्ट) सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ, सेक्टर-५, चारकोप, कांदिवली (प), मुंबई. वर्ष ३३ वे.
छायाचित्र - अनिल पानस्कर

## म ह त्वा चे

### रत्नागिरीत दहा हजार कोटींचा प्रकल्प

**रत्नागिरी :** संरक्षणावर (डिफेन्स) आधारीत प्रदूषण विरहीत दहा हजार कोटींचा प्रकल्प तालुक्यातील वाटद पंचक्रोशीत येणार असून, या प्रकल्पाच्या माध्यमातून स्थानिकांना मोठ्याप्रमाणात रोजगार उपलब्ध होणार असल्याचे राज्याचे उद्योगमंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत यांनी सांगितले. रत्नागिरीतील जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. वाटद पंचक्रोशीतील ग्रामस्थांना कोणी भडकवण्याचा प्रयत्न करीत असेल तर ग्रामस्थांशी चर्चा केली जाणार आहे. याठिकाणी प्रदूषण विरहीत असा डिफेन्सवर आधारीत प्रकल्प येणार आहे. दहा हजार कोटींच्या या प्रकल्पात स्थानिक तरुणांना मोठा रोजगार उपलब्ध होणार आहे. या प्रकल्पाबाबत कोणी विरोधकांनी वावड्या उठवण्याचा प्रयत्न करु नये, असे त्यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

### संभाजीनगरमध्ये हीट अ‍ॅण्ड रन, चौघांचा मृत्यू

**संभाजीनगर :** दहा वर्ष घरात पाळणा हालत नव्हता, अपत्य प्राप्तीसाठी सगळे प्रयत्न सुरु होते. देवाला नवसही केले. अखेर 10 वर्षांनी घरी चिमुकल्या पावलांचे आगमन झाले अन् अमरावतीच्या देसकर कुटुंबात आनंदाचे वातावरण पसरले. पण हा आनंद देवाने सहा महिन्यातच हिरावून घेतला. दहा वर्षांनी झालेल्या या चिमुकल्याच्या बारशाचा कार्यक्रम आटोपून येताना भयंकर अपघात झाला. या अपघातात चिमुकल्या लेकासह चौघांचा मृत्यू झाला. छत्रपती संभाजीनगरमध्ये घडलेल्या या काळीज पिळवटून टाकणाऱ्या घटनेने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. सविस्तर वृत्त पान 6

### कांदा 100 रुपयांपर्यंत जाणार



**लासलगाव :** केंद्र सरकारने कांद्याच्या निर्यातीवरील किमान निर्यात मूल्य मर्यादा हटवली आहे. सरकारच्या या निर्णयाचा शेतकऱ्यांना नक्कीच फायदा होणार असला तरी देशांतर्गत बाजारात कांद्याचे भाव वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेतला गेला असल्याची चर्चा आहे. असे असले तरी कांद्याचा दर 100 रुपयांवर जाण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

## भाजपाध्यक्ष नड्डा यांची 'सागर'वर खलबतं, गणपती दर्शनाच्या निमित्ताने विधानसभेची मोर्चेबांधणी

मुंबई

आज भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष, केंद्रीय मंत्री जे पी नड्डा हे मुंबई दौऱ्यावर असून त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, त्यासोबत लालबागच्या राजाचे दर्शन घेण्याबरोबर विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने देवेंद्र फडणवीस यांच्या सागर या शासकीय निवासस्थानी दोन तास मॅरेथॉन बैठक घेतली.

भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे पी नड्डा यांनी आज मुंबईत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वर्षा निवासस्थानी विराजमान गणपती बाप्पाचं दर्शन घेतलं. मुख्यमंत्री मुंबई बाहेर असल्याकारणाने मुख्यमंत्र्यांचे पुत्र, खासदार श्रीकांत शिंदे यांनी त्यांचं स्वागत केलं. त्यानंतर



त्यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सागर या निवासस्थानी जाऊन गणरायाचं दर्शन घेत आरती सुद्धा केली. यानंतर त्यांनी मुंबई महाराष्ट्रातील प्रमुख नेत्यांसोबत देवेंद्र फडणवीस यांच्या निवासस्थानी येणाऱ्या विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने महत्त्वाची बैठक घेतली. या बैठकीला महाराष्ट्र प्रभारी भूपेंद्र यादव, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, रावसाहेब दानवे, मुंबई अध्यक्ष आशिष शेलार इत्यादी नेते उपस्थित होते.

## काश्मीर तीन कुटुंबांनी उद्ध्वस्त केले

वृत्तसंस्था
दोडा

पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, जम्मू-काश्मीरला काँग्रेस, नॅशनल कॉन्फरन्स आणि पीडीपीच्या घराणेशाहीने उद्ध्वस्त केले. या तिन्ही कुटुंबांनी मिळून तुमच्यावर जे केले ते पापापेक्षा कमी नाही. अनेक दशकांपासून जम्मू-काश्मीरच्या बरबादीला तिन्ही कुटुंबे जबाबदार आहेत.

जम्मू-काश्मीरमधील विधानसभा निवडणुकीसाठी पंतप्रधान मोदी शनिवारी दोडा येथे पोहोचले. रॅलीला संबोधित करताना ते पुढे म्हणाले, आम्ही आणि तुम्ही



मिळून सुरक्षित काश्मीर बनवू, ही मोदींची हमी आहे. यावेळी जम्मू-काश्मीरच्या निवडणुका भविष्याचा फैसला करणार आहेत.या रॅलीतून मोदी यांनी चिनाब खोरे, दोडा, किश्तवाड आणि रामबन या तीन जिल्ह्यांतील 8 विधानसभा जागांवर भाजप उमेदवारांना मतांचे आवाहन केले. 18 सप्टेंबर रोजी पहिल्या टप्प्यात या 8 जागांसह 24 जागांवर मतदान होणार आहे.

42 वर्षात पंतप्रधानांची दोडा येथे ही पहिलीच भेट आहे. यापूर्वी 1982 मध्ये इंदिरा गांधी यांनी दोडाला भेट दिली होती. मोदी म्हणाले, जम्मू-काश्मीर विधानसभा निवडणूक तीन कुटुंब आणि जम्मू-काश्मीरच्या तरुणांमध्ये आहे. एका बाजूला तीन कुटुंबे, तर दुसऱ्या बाजूला स्वप्ने घेऊन निघालेली तरुण मंडळी. एक कुटुंब काँग्रेसचे, एक कुटुंब नॅशनल कॉन्फरन्सचे आणि एक कुटुंब पीडीपीचे आहे. पान 7 वर



## आम्ही पृथ्वीवर नक्की परत येऊ...

### सुनीता विल्यम्स यांनी अंतराळातून साधला संवाद

वृत्तसंस्था
वॉशिंग्टन

भारतीय वंशाची अंतराळवीर सुनीता विल्यम्स आणि अमेरिकन अंतराळवीर बुच विल्मोर हे गेले काही महिन्यांपासून अंतराळात अडकलेले असून नासाकडून त्यांना पुन्हा एकदा पृथ्वीवर आणण्याचे आटोकाट प्रयत्न सुरु आहेत. शुक्रवारी रात्री उशीरा त्यांनी पृथ्वीपासून 420 किलोमीटर अंतरावर असलेल्या स्पेस सेंटरमधून पत्रकार परिषद घेत अनेक प्रश्नांची उत्तरे दिली.

सुनिता विल्यम्स म्हणाली की, "आम्हाला स्टारलाइनर मिशन पूर्ण करायचे होते आणि पृथ्वीवर परतायचे होते. पण आता पृथ्वीवर परतण्याची पुढची संधी शोधावी लागेल. आम्ही पृथ्वीवर नक्की परत येऊ. काही वर्षांपूर्वी आम्ही दोघांनीही स्पेस स्टेशनमध्ये मोठा मुक्काम केलेला होता. गरज पडल्यास आम्ही इथे 8 , 9 किंवा 10 महिने राहू शकतो. पण, मी कुटुंबाला मिस करते." असे म्हणत तिने आपल्या भावना व्यक्त केल्या. तसेच बुच विल्मोर म्हणाले की, "अवकाशयानाचा पायलट म्हणून काही कठीण प्रसंग आले. पण या मिशनमुळे जवळजवळ एक वर्ष अंतराळात राहावे लागेल याची अपेक्षा नव्हती. पण, मला या गोष्टींची कल्पना होती की अशा समस्या येऊ शकतात ज्यामुळे आम्हाला पृथ्वीवर येण्यास वेळ लागेल. कारण या क्षेत्रामध्ये या समस्या घडू शकतात."

## विरोधकांकडून पंतप्रधानपदाची ऑफर होती!



नागपूर

केंद्रीय परिवहन आणि राष्ट्रीय महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी शनिवारी मोठा गौप्यस्फोट केला. लोकसभा निवडणुकीपूर्वी विरोधी पक्षाच्या एका वरिष्ठ नेत्याने त्यांना पंतप्रधानपदाची ऑफर दिली होती, असा गौप्यस्फोट गडकरी यांनी केला आहे. मात्र आपण ती ऑफर नाकारली, असंही ते म्हणाले. नागपूर येथे एका कार्यक्रमात त्यांनी हा गौप्यस्फोट केला.

यावेळी बोलताना नितीन गडकरी म्हणाले, "विरोधी पक्षाच्या एका वरिष्ठ नेत्याने मला पंतप्रधानपदाची ऑफर दिली होती. मात्र मी ती नाकारली. मी त्या नेत्याला सांगितले की, मी एक विचारधारा मानणारा व्यक्ती आहे. मी अशा पक्षात आहे ज्याने मला जे हवे होते ते सर्व दिले आहे. कोणताही प्रस्ताव मला मोहात पाडू शकत नाही."






# जरांगेंना रोहित पवार व टोपेंनी आंदोलनाला बसवले

प्रतिनिधी
मुंबई

मराठा आरक्षणाच्या मुद्यावरून मंत्री छगन भुजबळ व मराठा आंदोलक मनोज जरांगे यांच्यात पुन्हा एकदा कलगीतुरा रंगला आहे. आंतरवाली सराटीतील पोलिसांच्या लाठीचार्जनंतर मनोज जरांगे पाटील आपल्या घरामध्ये जाऊन झोपले होते. पण रोहित पवार व राजेश टोपे यांनी त्यांना तेथून उठवून पुन्हा आंदोलनस्थळी आणून बसवले. त्यानंतर शरद पवार व उद्धव ठाकरेंनी त्यांची भेट घेतली, असा आरोप भुजबळ यांनी शनिवारी जरांगेंवर निशाणा साधताना केला. त्यांच्या या आरोपानंतर जरांगेंनी भुजबळ चमत्कारी बाबा असल्याची टीका करत त्यांच्यावर जोरदार पलटवार केला.



राज्याचे अन्न व पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी शनिवारी पत्रकारांशी बोलताना म्हणाले की, आंतरवाली सराटीत दगडफेक व लाठीचार्जची घटना घडल्यानंतर मनोज जरांगे आंदोलन सोडून आपल्या घरी जाऊन झोपले होते. पण रोहित पवार व राजेश टोपे या दोघांनी मध्यरात्री 2 वाजता तिथे जाऊन त्यांना पुन्हा आंदोलनस्थळी आणून बसवले. त्यानंतर शरद पवार यांना तिथे नेले. त्यानंतर उद्धव ठाकरेही तिथे गेले. दगडफेकीच्या या घटनेत जवळपास 80 पोलिस कर्मचारी जखमी झाले होते. जखमींत महिला कर्मचाऱ्यांचाही समावेश होता. पोलिसांनी स्वतःच्या संरक्षणासाठी हा लाठीमार केला होता. दोन्ही मोठे नेते गेल्यामुळे ही घटना मोठ्या लोकसंख्येपर्यंत पोहोचली. त्याचा फायदा जरांगेंना झाला. या संपूर्ण घटनेत या दोघांचा हात आहे असा तेथील लोकांचा आरोप आहे, असे छगन भुजबळ म्हणाले.

### दोन समाजात भांडणे लावण्याचा उचललेला विडा खाली ठेवा



ओबीसींचे राजकीय आरक्षण संपवणाऱ्या भाजपला टोकाचा विरोध करणारा आपल्यासारखा ज्येष्ठ नेता आज माझ्यावर तसेच राजेश टोपे साहेबांवर 'ज्यांच्या सांगण्यावरून आरोप करत आहेत त्याच नेत्याच्या' हातात आज गृहमंत्रालय आहे. त्यामुळे त्यांना सांगून माझ्यावरील आपण केलेले आरोप सिद्ध करून माझ्यावर कायदेशीर कारवाई करायला सांगा, हे माझे आपणास जाहीर आव्हान आहे. हा शिव-शाहू-फुले-आंबेडकरांचा पुरोगामी महाराष्ट्र आहे. त्यामुळे दोन समाजात भांडणे लावण्याचा उचललेला विडा खाली ठेवा आणि महाराष्ट्राच्या जनतेला सुखाने नांदू द्या तसेच भाजप नेत्यांच्या नादाला लागून महाराष्ट्राची वाट लावण्यापेक्षा जनतेच्या खऱ्या समस्यांकडे लक्ष द्या, असे रोहित पवार यांनी आज भुजबळांच्या आरोपावर बोलताना म्हटले आहे.

## हुतात्मा स्मारकात अनधिकृत वाहनांची पार्किंग

**मोखाडा:** देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात बलिदान दिलेल्या मोखाड्यातील स्वातंत्र्यसैनिक सखाराम खरोटे यांच्या स्मरणार्थ बसस्थानकाजवळ महाराष्ट्र शासनाच्या माध्यमातून हुतात्मा स्मारक उभारण्यात आलेले आहे.पूर्वी पेक्षा आता जरी हे स्मारक सुसज्ज आणि चांगल्या प्रकारे तयार करण्यात आलेले असले तरी सुद्धा या स्मारकाचा ताबा हा शासकीय कार्यालयाकडे नसल्याने आजच्या घडीला या हुतात्मा स्मारकामध्ये खासगी ठेकेदाराने बांधकामासाठी लागणारी रेती,खड्डी साठवून ठेवली आहे.तसेच आपले अवजड वाहन सुध्दा याच ठिकाणी पार्किंग केले आहे.यामुळे हे हुतात्मा स्मारक नसून मटेरियल साठवण्याचे गोदाम बनले आहे. सुरुवातीच्या काळात हुतात्मा स्मारकाची इमारत मोडकळीस येवून गर्दुल्यांसाठी नशेचे केंद्र बनले होते.मात्र जिल्हा परिषद बांधकाम विभागाच्या माध्यमातून लाखो रुपयांचा निधी खर्च करून हुतात्मा स्मारकाचा चेहरामोहरा बदलून टाकण्यात आलेला आहे.परंतु स्मारकाचा ताबा शासकीय कार्यालयाकडे नसल्याने खासगी व्यक्तींनी या स्मारकाचा वापर हा केवळ स्वतःच्या स्वार्थासाठी करायला घेतला असून स्मारकात बांधकामासाठी लागणारी रेती, खडीचा ढिग करुन ठेवला आहे.तसेच मटेरियल वाहतुकीसाठी लागणारे अवजड वाहन सुध्दा याच ठिकाणी पार्किंग केले आहे.



## थोडक्यात

### विरारमध्ये पत्नीची हत्या, पतीला अटक

**मुंबई:** विरारमध्ये एका इसमाने आपल्या पत्नीची चाकूने वार करून हत्या केल्याचे उघडकीस आले आहे. हत्येनंतर फरार झालेल्या पतीला पोलिसांनी अटक केली आहे. विरार पूर्वेच्या मनवेलपाडा परिसरातील वावटेवाडी येथील एकविरा इमारतीत गोपाळ राठोड(३८) हा पत्नी भारती (३२) आणि १४ वर्षीय मुलीसोबत रहात होता. गोपाळ यास मद्याचे व्यसन होते. गोपाळचा पत्नीच्या चारित्र्यावरही संशय होता. त्यावरून त्याचे पत्नी भारती सोबत भांडणे व्हायची. शुक्रवारी त्यांच्यात नेहमीप्रमाणे भांडण झाले होते. त्यावेळी राठोड याने पत्नी भारतीच्या छाती आणि पोटावर वार केले. यात तिचा मृत्यू झाला. विरार पोलिसांनी याप्रकरणी हत्येचा गुन्हा दाखल केला आहे. हत्येनंतर पळून गेलेल्या गोपाळ याला कल्याण येथून पोलिसांनी अटक केली आहे. तो पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेऊन तिला सतत मारहाण करत होते. त्या वादातून ही हत्या करण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले. आरोपी गोपाळ याला शनिवारी न्यायालयात हजर करण्यात आले असता त्याला १७ सप्टेंबरपर्यंत पोलीस कोठडी देण्यात आली आहे.

### 'गुगल पे' वरून स्वीकारली 3 हजारांची वसई; शिपायाला अटक

**मुंबई:** 'गुगल पे' वरून ३ हजारांची लाच स्विकारणाऱ्या एका पोलिसाला मुंबईच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने अटक केली आहे. मंगेश नामदेव राक्षे (४२) असे या पोलिसाचे नाव असून तो मिरा रोड येथील काशिगाव पोलीस ठाण्यात कार्यरत आहे. तक्रारदार हे वाहनचालक आहेत. मंगळवार ११ सप्टेंबर रोजी ते कल्याण येथून परतत असताना काशिमिरा येथे त्याचे वाहन बंद पडले होते. ते वाहन त्यांनी रस्त्याच्या कडेला उभे केले होते. त्याचवेळी काशिगाव पोलीस ठाण्यात कार्यरत असलेल्या मंगेश राक्षे या पोलीस शिपायाची दुचाकी या वाहनाला धडकली. त्यामुळे राक्षे आणि तक्रारदार वाहनचालक यांचा वाद झाला. राक्षे याने तक्रारदाराचा वाहन परवाना काढून घेतला आणि तो परत हवा असल्यास १० हजार रुपयांची लाच देण्यास सांगितले. तक्रारदाराच्या बँक खात्यात त्यावेळी ३ हजार रुपये होते. राक्षे याने ते ३ हजार रुपये एका पानवाल्यास गुगल पे द्वारे पाठवायला सांगितले. मात्र बुधवारी राक्षे याने पुन्हा तक्रारदाराकडे उर्वरित ७ हजार रुपयांची मागणी केली. त्यामुळे तक्रारदाराने वरळीच्या लाचलुचपत प्रतिबंधक शाखेकडे याबाबत तक्रार केली.

### भाईंदर शहराला डेंगू- मलेरियाचा धोका

**भाईंदर :**मिरा-भाईंदर शहरात डेंगू आणि मलेरिया आजाराने हातपाय पसरण्यास सुरुवात केली आहे. मागील महिन्याभरात बाधित रुग्ण संख्येत चार पटाहून अधिकची वाढ झाली असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे पालिकेकडून नागरिकांनी विशेष काळजी घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

**महत्त्वपूर्ण निवेदन**

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीचा मजकूर स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी आपल्या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तींबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान व हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.ला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्याच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी वाचकांनी आवश्यकती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

# पालिकेच्या व्हीआयपींच्या यादीत राजकारण्यांचा भरणा

## शहरातील मान्यवर नागरिकांना वगळले

प्रतिनिधी
■ मुंबई

वसई- वसई विरार महापालिकेने शहरातील अतिमहत्वाच्या २४५ व्यक्तींची (व्हीआयपी) यादी प्रसिध्द केली आहे. त्यामध्ये फक्त विविध शासकीय अधिकारी आणि राजकारण्यांचा भरणा करण्यात आला आहे. वसई विरार शहरात विविध क्षेत्रातील मान्यवर असताना त्यापैकी एकाचाही यादीत समावेश नसल्याबद्दल नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

वसई विरार महापालिका विविध उपक्रम राबवत असते. या उपक्रमांसाठी शहरातील मान्यवरांना आमंत्रण देण्यात येते. अशा कार्यक्रमात त्यांना मानाचे स्थान देण्यात येत असते. यासाठी पालिकेने शहरातील अतिमहत्वाच्या व्यक्तींची यादी तयार करण्यात आली आहे. या यादीतील लोकांना अतिमहत्वाचा दर्जा देण्यात आला आहे. सामाजिक कार्यकर्ते डॉ दिनेश कांबळे यांनी या अतिमहत्वाच्या व्यक्तींच्या यादीत कोण आहे त्याची माहिती माहिती अधिकारात विचारली होती. पालिकेने दिलेल्या यादीत २४५ जणांचा समावेश आहे. या यादी मध्ये मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री राज्याचे सचिवांपासून आजी माजी खासदार, आजी माजी नगरसेवक, सर्व राजकीय पक्षांचे प्रतिनिधी यांचा समावेश आहे. मात्र शहरातील एकही साहित्यिक, कलावंत, चित्रकार, खेळाडू, डॉक्टर्स, प्राध्यापक यांचा समावेश नाही. याबद्दल नाराजी व्यक्त होत आहे.

वसई विरार महापालिकेने यादी तयार करताना सर्वच क्षेत्रातील महत्वाच्या व्यक्तींना स्थान देणे आवश्यक होते. वसई शहरात अनेक राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर नावाजलेले मान्यवर राहतात. त्यांचा यादीत समावेश केला असता तर पालिकेची शोभा वाढली असती. परंतु केवळ राजकारणी, पोलीस, पालिका आणि शासकीय अधिकाऱ्यांचा समावेश करण्यात आला आहे, असे कांबळे यांनी सांगितले. राज्याचे सचिव, मंत्री, माजी अधिकारी यांचा तर राजशिष्टाचार असतो. मग पुन्हा त्यांना यादीत स्थान का असा सवालही त्यांनी केला.

अतिमहत्वाच्या व्यक्तींमध्ये राजशिष्टाचारानुसार अधिकारी, आजी माजी लोकप्रतिनिधी, राजकीय पक्षांच्या प्रमुखांचा समावेश असतो. परंतु शहरातील मान्यवरांचा समावेश करण्याबाबत विचार केला जाईल, असे पालिकेचे अतिरिक्त आयुक्त रमेश मनाळे यांनी सांगितले.

# मालमत्ता थकबाकीदारांना पालिकेचा दणका

## जप्तीच्या नोटिसा बजावण्यास सुरवात




प्रतिनिधी
■ वसई

मालमत्ता कराची रक्कम वर्षानुवर्षे थकीत ठेवणाऱ्या मालमत्ता धारकांवर पालिकेने जप्तीची कारवाई सुरू केली आहे. सुमारे ८ हजार ५७१ इतक्या मालमत्ता धारकांना जप्तीच्या नोटिसा पाठविल्या आहेत. दिलेल्या मुदतीत कर भरणा न झाल्यास त्या मालमत्ता जप्त करून लिलाव केला जाणार आहे.

वसई विरार भागात ९ लाखाहून अधिक छोट्या मोठ्या औद्योगिक वसाहती, उपहारगृहे, इमारती, सदनिका अशा विविध मालमत्ता आहेत. या मालमत्ताकरातून पालिकेला उत्पन्न मिळते. मालमत्ता कर हा पालिकेच्या उत्पन्नाचा प्रमुख स्रोत आहे. मात्र काही मालमत्ता धारकांनी वर्षानुवर्षे पालिकेचा मालमत्ता कर भरणा न केल्याने पालिकेला मोठा आर्थिक फटका बसू लागला आहे.

यावर्षी पालिकेने एप्रिल महिन्याच्या सुरवातीपासूनच कर संकलन करण्यावर भर दिला आहे. विशेषतः ज्या मालमत्ता धारकांनी मागील तीन ते चार वर्षांपासून कर थकीत ठेवला आहे त्या मालमत्ता धारकांवर लक्ष केंद्रित केले आहे. वेळोवेळी सूचना नोटिसा देऊनही कर भरणा करण्याकडे पुढे येत नसल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १२८ व अनुसूची ड प्रकरण ८ कराधान नियम ४७ अन्वये थकबाकी दारांच्या मालमत्ता जप्त करून त्याचा लिलाव करण्याचे आदेश महापालिका आयुक्त अनिलकुमार पवार यांनी कर संकलन विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले आहेत. त्यानुसार आता कारवाई करण्यास सुरवात झाली आहे.

आतापर्यंत महापालिकेने ८ हजार ५७१ इतक्या मालमत्तांना जप्तीच्या नोटिसा बजावल्या असून त्यांची थकीत रक्कम ही २४ कोटी ७ लाख इतकी आहे. ज्या थकबाकीदारांनी वर्षानुवर्षे मालमत्ता कराचा भरणा केलेला नाही त्यांना जप्तीपूर्व नोटीसा देण्यात आल्या असून नोटीसा वाटपाचे काम सुरु आहे. यानंतरही कर भरणा न केल्यास अशा थकबाकीदारांच्या मालमत्ता जप्त करून लिलाव केला जाईल असा इशारा पालिकेने दिला आहे.

**चालू वर्षात १५१ कोटींचा कर वसूल**

*यंदाच्या वर्षी मालमत्ता कर संकलन चांगल्या प्रकारे व्हावे यासाठी एप्रिलपासूनच कराची देयके मालमत्ता धारकांना बजावण्यास सुरुवात केली आहे. संकेतस्थळावर ऑनलाइन स्वरूपात कर भरणा करण्याची सुविधा उपलब्ध केली आहे. यंदाच्या २०२४-२५ या आर्थिक वर्षात आतापर्यंत पालिकेने १५१ कोटी ४३ लाख रुपये इतका मालमत्ता कर वसूल केला आहे.*

# पालघर पोलीस दल व युथ फॉर पिपल संस्थेच्या संयुक्त विद्यमाने गरजू विद्यार्थिनींना सायकल वाटप

प्रतिनिधी
■ मोखाडा



पालघर जिल्हा पोलीस दल व यूथ फॉर पिपल संस्था मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच पालघर पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील यांच्या संकल्पनेतून मोखाडा तहसील कार्यालयात जनसंवाद अभियान अंतर्गत तालुक्याच्या विविध भागातील जवळपास ५२ गरजु व गुणवंत विद्यार्थिनींना मोफत सायकलींचे वाटप करण्यात आले.अधीक्षक बाळासाहेब पाटिल व यूथ फॉर पिपिल संस्थेचे नारायण वेंकटेश यांच्या हस्ते सायकल वाटप उपक्रम यशस्वी झाला.

या कार्यक्रमा प्रसंगी बोलताना बाळासाहेब पाटिल यांनी सांगितले की यूथ फॉर पिपल ही संस्था गेल्या दहा वर्षांपासून गराजूंना मदतीसाठी कार्यरत आहे,जनसंवाद अभियान अंतर्गत शालेय मुलींना सायकल वाटप आम्ही करत आहोत ह्या सायकल चे महत्व येत्या काही दिवसात दिसणार आहे,कारण ज्यांना गरज नाही त्यांच्यापर्यंत सगळ्या सुविधा उपलब्ध होतात मात्र ज्यांना खरच गरज आहे त्यांना मात्र काहीही सुविधा मिळत नाही,मुलींना शाळेत ये-जा करण्यासाठी सायकल चा उपयोग होणार आहे.खरंतर पालघर जिल्हा हा आदिवासी बहुल जिल्हा आहे त्यामध्ये येथील नागरिकांना अनेक समस्या उद्धावतात ह्या समस्यांच्या खोलवर जाऊन समस्या मूळासकट नाहीसे करने हे तुमचे आमचे काम आहे.यासाठी प्रत्येक गावात पोलिस पाटिल हे कौतुकास्पद काम करत आहेत.

यावेळी जिल्हा परिषद अध्यक्ष(राज्य मंत्री दर्जा)प्रकाश निकम यांनी सांगितले की शालेय मुलींना मोफत सायकल वाटप केली यात मुलींना शाळेत ये-जा करण्यासाठी सोईस्कर ठरणार आहे.मुलगी शाळेत गेलीच पाहिजे कारण आपल्या जिल्ह्यात बऱ्याच भागात बालविवाह मुळे अनेक मुलीनी आपला जीव गमावले आहे हे कुठेतरी थांबले पाहिजे पोलिस यंत्रणा कार्यवाही करणारच परंतु आपली मुलगी अठरा वर्षाची झाल्यानंतर ती जेव्हा स्वतःच्या पायावर ऊभी राहिल त्यावेळी त्यांच्या कुटुंबाने त्या मुलीच्या लग्नाचा विचार करावा यामुळे आपण बालविवाह रोखु शकतो.

विक्रमगड विधानसभेचे आमदार सुनील भुसारा यांनी बोलताना सांगितले की सामाजिक कार्य प्रत्येक पुढारी आप आपल्या क्षेत्रात करत असतो,पुढारी फक्त राजकीय क्षेत्रात नसून प्रत्येक क्षेत्रात असतो सरळ मार्गाने लोकांना एकत्र घेवून त्यांच्या समस्याचे निवारण करतो तो खरा पुढारी खरंतर पालघर पोलिस दल पोलिस कार्य बजावत आहेत त्याचप्रमाणे एक सामाजिक कार्य सुद्धा जनसंवाद अभियान अंतर्गत करत आहेत शालेय मुलींना जी काही सायकल मोफत वाटप केली त्याबद्दल आपले अभिनंदन व कौतुक करत आहे.

यावेळी पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटिल,यूथ फॉर पिपल संस्थेचे नारायण वेंकटेश, जि.प पालघर अध्यक्ष प्रकाश निकम,आमदार सुनील भुसारा,अ.पो. अधीक्षक विनायक नरळे,युथ फॉर पिपल संस्थेचे नारायण वेंकटेश,दिपकजी,तहसील दार मयूर खेंगले,उप विभागीय पोलिस अधिकारी गणपत पिंगळे,सेवानिवृत्त पोलिस अधिकारी धनंजय तायडे,सहा.पो.निरीक्षक प्रदीप गीते(नागरी सुरक्षा केंद्र पालघर),सहा. पोलिस निरीक्षक प्रेमनाथ ढोले,पंचायत समिती उपसभापती प्रदिप वाघ, भाजपा तालुका प्रमुख संतोष चोथे,जमशिद शेख,ज्येष्ठ नेते प्रल्हाद कदम,डॉ.मिठाराम कडव व मोखाडा तालुक्यातील सर्व पोलिस पाटील उपस्थित होते.

# मीरा- भाईंदरमध्ये आढळली 17 कुपोषित बालके

प्रतिनिधी
■ भाईंदर

राष्ट्रीय बाल स्वास्थ्य योजनेंतर्गत वर्षातून दोन वेळा अंगणवाडीच्या माध्यमातून तपासणी केली जाते .त्यात मीरा -भाईंदर शहरात १७ कुपोषित बालके सापडली आहेत. यात ९ तीव्र कुपोषित तर ८ मध्यम कुपोषित अशी बालके आढळून आली आहेत. मीरा- भाईंदर शहरात कुपोषित माता-बालकांवर उपचार करण्यासाठी आवश्यक असलेले 'पोषण पुनर्वसन केंद्र' नसल्याची बाब समोर आली आहे.

परिणामी पीडित माता-बालकांना २८ किलोमीटर लांबचा प्रवास करून ठाण्याचे जिल्हा रुग्णालय गाठण्याची नामुष्की ओढावत आहे. तसेच हे केंद्र २०१७ साली तत्कालीन महापौर गीता जैन आणि तत्कालीन आयुक्त डॉ. नरेश गीते यांच्या प्रयत्नाने भाईंदर पश्चिमेच्या टेम्बा रुग्णालयात सुरू झाले होते. आता ते बंद असल्याने मुलांना वैद्यकीय उपचार घेण्यास मोठी अडचण निर्माण झाली आहे.

# घरकुल योजनेपासून साकुर ग्रामपंचायतीचे खरे लाभार्थी वंचित..

## सरपंच,सदस्य यांच्या नाते वाईकांना टक्केवारी देणाऱ्यास दिली जाते घरकुल योजना- ग्रामस्थांचा आरोप



प्रतिनिधी
■ मोखाडा

जव्हार तालुक्यातील साकुर ग्रामपंचायती अंतर्गत दोन वर्षापासून ड यादीतील प्रधानमंत्री आवास योजना राबवण्यात येत असून त्यापैकी चालू वर्षात ग्रामपंचायत कडून ५० लाभार्थ्यांच्या नावांची यादी प्रसिद्ध करण्यात आली.जुन्या ड यादी प्रमाणे क्रमवारी घरकुलाचा लाभ न देता जो टक्केवारी देईल त्याला व सरपंच,सदस्य यांच्या नातेवाईकांना लाभ दिला जातो असा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

ग्रामपंचायत व पंचायत समिति ग्रामीण गृहनिर्माण अभियंता(RHE) यांनी संबंधित लाभार्थ्याकडून घरकुले न बांधताच टक्केवारी घेऊन बिले काढून दिलेली आहेत तसेच काही लाभार्थ्यांनी जुन्या घरकुलांच्या बांधकामावरच पुढच्या भागास नवीन काम दाखवून देऊन खोटी बिले काढले तसेच काही बांधलेल्या घरकुलांना संडास बांधलेले नाही त्यामुळे खऱ्या व गरजू लाभार्थ्यांना डावलून काही पक्के घरे असणाऱ्या बोगस लाभार्थ्यांना प्रधानमंत्री आवास योजनेचा व शबरी घरकुलांचा लाभ ग्रामपंचायत देत असल्याचे चित्र दिसत आहे असे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. या घटनेचा साकुर ग्रामस्थांनी गंभीर आरोप ग्रामपंचायत वर केला आहे. तळागाळातील वंचित गोरगरिबांना घरकुलाचा लाभ मिळावा,यासाठी केंद्र व राज्य शासन सर्वतोपरी प्रयत्न करीत आहे मात्र स्थानिक पातळीवर खऱ्या लाभार्थ्यांना डावलून शेती व पक्के घर असणाऱ्या व पात्र नसणाऱ्या बोगस लाभार्थ्यांना पंतप्रधान आवास योजनेचा लाभ व शबरी घरकुल योजनेचा लाभ दिला असल्याचा धक्कादायक आरोप साकुर येथील ग्रामस्थांनी केला आहे.सदर प्रधानमंत्री आवास योजना घरकुलाची यादीची फेरचौकशी तसेच शबरी घरकुल योजनेतून झालेल्या सर्व घरकुलांची चौकशी होऊन न्याय मिळावा.

दोषी आढळल्यास संबंधितांवर कारवाई करावी तसेच चालू घरकुल योजनेच्या यादीला सदर चौकशी होईपर्यंत स्थगिती देण्यात यावी अश्या मागणीचे निवेदन पालघर जिल्हाधिकारी यांना तसेच विक्रमगड विधानसभेचे आमदार सुनील भुसारा व गटविकास अधिकारी (ऊ.श्रे) जव्हार यांना देण्यात आले आहे.

# ज्येष्ठ पत्रकार विजय वैद्य यांचे दु:खद निधन

## 82 व्या वर्षी घेतला अखेरचा श्वास

प्रतिनिधी
■ मुंबई



ठाणे जिल्हा पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष, मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाचे माजी अध्यक्ष, मुंबई मराठी पत्रकार संघाचे माजी उपाध्यक्ष, एकता विनायक संस्थेचे उपनगरचा राजा सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ, मागाठाणे मित्र मंडळ, प्रबोधनकार ठाकरे ग्रंथालय अशा विविध संस्थांचे संस्थापक, आधारस्तंभ श्री विजय दत्तात्रय वैद्य यांचे आज सकाळी त्यांचे ज्येष्ठ सुपूत्र श्री. वैभव यांच्या बोरीवली पूर्व येथील ॲम्ब्रोसिया या निवासस्थानी दु:खद निधन झाले. ते ८२ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी वैशाली, सुपूत्र वैभव, विक्रांत, सुना प्रतिमा आणि अनघा, नातवंडे हर्षल आणि गौरी असा परिवार आहे.

काल दिवसभर उपनगरचा राजा गणेशोत्सव मंडळाची आमंत्रणे वाटण्याचे काम करीत होते. आज सकाळी अस्वस्थ वाटू लागल्याने त्यांना दवाखान्यात नेण्याचा प्रयत्न केला पण त्यांची तिथेच प्राणज्योत मालवली. दुपारी दोन वाजता त्यांची अंत्ययात्रा एका सजवलेल्या रथातून ॲम्ब्रोसिया येथून निघाली. विजय वैद्य यांची कर्मभूमी असलेल्या जय महाराष्ट्र नगर येथील त्यांच्या निवासस्थानी नेण्यात आला. तेथे अंतीम इच्छेनुसार आजच्या सर्व वर्तमानपत्रे त्यांच्या पार्थिवा जवळ ठेवण्यात आली. बॅंड पथकाने भक्तीगीते वाजवून त्यांना मानवंदना दिली.



## पार्कसाईट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ ट्रस्ट आयोजित श्रीची भव्य राजाशाही मूर्ती

प्रतिनिधी
■ मुंबई

विक्रोळी (पश्चिम) पार्क साईट येथील छत्रपती शिवाजी महाराज मैदान येथे पार्कसाईट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ ट्रस्ट च्या वतीने विविध उपक्रमातून गणेशोत्सव साजरा केला जात आहे. या ' सार्वजनिक गणेशोत्सव मंडळातील " श्री" भव्य राजाशाही मूर्ती सर्व भाविकांना आकर्षित करत आहे. पार्कसाईट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ ट्रस्ट चे यंदाचे 63 वे वर्ष असून गणेशोत्सवा सोबतच अनेक उपक्रम वर्षभर मंडळातर्फे राबविले जातात. दरवर्षी जानेवारी महिन्यात होणारे 'भव्य रक्तदान शिबिर' त्यापैकी एक. यावर्षी ७०२ रक्त बाटल्या संकलित करण्यात आल्या. महापालिका आणि राज्य शासनाच्या रक्तपेढ्यातील रक्त तुटवडा लक्षात घेता गरीब गरजू रुग्णांसाठी मंडळाच्या वतीने ही सेवा रुजू करण्यात आली. मंडळाच्या विविध सामाजिक उपक्रमाची दखल घेऊन मुंबई महानगरपालिकेच्या 'गणेश गौरव पुरस्कार 2023' मध्ये मंडळाला "सामाजिक उपक्रमाकरिता" प्रमाणपत्र देऊन मंडळाचा सन्मान करण्यात आला अशी माहिती विश्वस्त सरचिटणीस राजेश समेळ यांनी दिली.

# टिळक नगर येथील सह्याद्री क्रीडा मंडळाने साकारले संकट मोचन हनुमान मंदिराचा देखावा

प्रतिनिधी
■ मुंबई



टिळक नगर येथील सह्याद्री क्रीडा मंडळाने यंदा संकट मोचन हनुमान मंदिराचा देखावा साकारला असून राम भक्तांना येथील भव्य हनुमानाची मूर्ती आकर्षित करत आहे. संकट मोचन हनुमान मंदिराचे दर्शन घडत असल्याने भाविक जय श्रीराम, जय हनुमानचा जय घोष करत दर्शन घेत आहेत. टिळकनगर चेंबूर येथील सह्याद्री क्रीडा मंडळ दरवर्षी नावीन्य पूर्ण संकल्पना आखत भव्य दिव्य मंडप उभारून अनेक नानाविध प्रतिकृती साकारणारे मंडल म्हणून त्यांची प्रसिध्दी आहे. यंदा सह्याद्री क्रीडा मंडळाने संकट मोचन हनुमान मंदिर साकारले असून हे भव्य स्वरूपातील मंदिर पाहण्यासाठी लोकांनी गर्दी केली आहे. या मंदिरात हनुमानाची भव्य मूर्ती तसेच श्रीराम लक्ष्मण आणि सीता यांच्या मूर्ती साकारण्यात आले आहे . सह्याद्री क्रीडा मंडळाचे अध्यक्ष राहूल गजानन वाळंज यांच्या नेतृत्वाखाली सह्याद्री क्रीडा मंडळाचे यंदाचे 48 वे वर्ष साजरे होत असून सुवर्ण महोत्सवी वर्षाकडे मंडळाची वाटचाल सुरू आहे. सह्याद्रीत पर्यावरण पूरक गणेश उत्सव साजरा केला जातो. सह्याद्री क्रीडा मंडळाचे अध्यक्ष राहूल गजानन वाळंज हे असून उपाध्यक्ष अमित सातर्डेकर, कार्यवाह राजेंद्र मोहिते आणि खजिनदार जया शेट्टी हे आहेत. या मंडळात दरवर्षी पर्यावरण पूरक गणेश उत्सव साजरा केला जातो.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, माझे अशिल श्री. राजेंद्र मनहरलाल व्यास व रमिलाबेन राजेंद्र व्यास ह्या दोघांच्या मालकीचा भाईंदर (पूर्व) ता. व जि. ठाणे ४०११०५, कॅबिन रोड वरील, न्यू शांती निवास "ए" सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित., या संस्थेतील ए विंग मधील तिसऱ्या मजल्यावरील, सदनिका क्र. ३०१ माझ्या अशिलांच्या मालकीची आहे. सदर मिळकतीचा डेरिया व पटेल बिल्डर्स आणि सरिता शांताराम शिर्के यांच्या दरम्यान झालेला दि. १८ डिसेंबर १९९३ चा मूळ करारनामा गहाळ झाला आहे. सदर करारनामा शोधूनही मिळत नाही. तसेच संस्थेने माझ्या अशिलाला ३८ क्रमांकाचे १८६ ते १९० असलेला भाग दाखला दिला आहे. सदर भाग दाखल्यामध्ये श्री. अमिष नरेश दोशी व छायाबेन नरेश दोशी यांचे नाव नजर चुकीने न घातल्याचे समजते. माझ्या अशिलाने मला सदर सदनिकेचे नो क्लेम सर्टिफिकेट देण्याची विनंती केली आहे.

तरी सदर सदनिकेवर, त्याच्या वरील गहाळ मूळ करारनाम्यावर वा त्याच्या भाग दाखल्यावर कुणाचाही हक्क, हितसबंध, गहाणवट, वारसाहक्क वगैरे असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसाचे आत लेखी, योग्य त्या कागदपत्रासह ऑफिस क्र.२, पहिला मजला, न्यू शांती गंगा अपार्टमेंट, स्टेशन रोड, भाईंदर (पू), ता. व जिल्हा ठाणे, ४०११०५ येथे कळवावे. दिलेल्या मुदतीत कळविण्यात न आल्यास सदर सदनिकेचे नो क्लेम सर्टिफिकेट देण्यास कुणाचीही हरकत नाही. तसेच सदर सदनिका माझ्या अशिलाने विकण्यास कुणाचीही हरकत नाही असे समजून त्या बाबत माझ्या अशिलांना नो क्लेम सर्टिफिकेट देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

कळावे,

**जॉन एम रॉड्रीक्स**
**वकील**
**मो. नं. - ९८९२४०१३४९**

Printed and Published by **Bhushan B.Mhatre** for Owner **Marik Media And Communication Pvt .Ltd.** at S.R.Publicatiinns ,Mohan Arjun Compound ,Godown No. 8,9 And 10 , Near Ghartan Pada ,Vaishali Nagar ,Last Bus Stop ,Dahisar (E ) ,Mumbai -400068 and Published From Marik Media And Communication Pvt .Ltd.,102, Shyam Sunder Sadan ,Sitaram Jadhav Marg, Lower Parel ,Mumbai 400013. Editor - **Deepak B. Mhatre**, E-mail vruttmanas1@ gmail.com ,telephone 2498546,24985609. Resident Editor - **Sham Deulkar**

**As per PRB Act Editorial Responsibilities On Deepak B. Mhatre Nespaper Related Desputes Lies Under Jurisdiction of Mumbai Courts**

**Year - Twenty Nine**
**Issu - 86**
**R.N.I. Registration No. - 65609/96**

मुद्रक आणि प्रकाशक **भूषण भा. म्हात्रे** यांनी मालक **मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.** साठी, एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडाऊन नं. ८,९ आणि १०, घारटन पाडाजवळ, वैशालीनगर लास्ट बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई - ४०० ०६८ येथे छापून मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि., १०२, श्याम सुंदर सदन, सीताराम जाधव मार्ग, लोअर परळ (पश्चिम), मुंबई - ४०० ०१३ येथून प्रकाशित केले. संपादक - **दीपक भा. म्हात्रे,** E-mail: vrittamanas1@gmail.com दूरध्वनी क्रमांक - २४९८५४६, २४९८५६०९ निवासी संपादक - **शाम देऊलकर**

**पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी दीपक भा. म्हात्रे यांच्यावर राहील. सदर वृत्तपत्रासंबंधीच्या विवादित बाबी मुंबई न्यायालय क्षेत्रात येतील.**

**वर्ष- एकोणतीसावे**
**अंक - ८६**
**आर.एन.आय. रजिस्ट्रेशन क्र.- ६५६०९/९६**



दिनकर राजाराम घाडी, मुंबई देखावा सजावट : भरत घाडी.



भारतीय जनता पार्टीचे चांदिवली विधानसभा अध्यक्ष व माजी नगरसेवक प्रकाश देवजी मोरे व उत्तर मध्य मुंबई जिल्हा महिला मोर्चा च्या उपाध्यक्षा उषाताई प्रकाश मोरे यांच्या निवासस्थानी अक्कलकोट श्री स्वामी समर्थ महाराज यांच्या रूपात श्री गणेशाची मूर्ती स्थापना करण्यात आली. याप्रसंगी विधिवत पूजा करताना प्रकाश मोरे, उषा मोरे आणि मुलगी प्रतीक्षा मोरे दिसत आहेत



हिरलेकर परिवार, पुनम नगर, विरार पश्चिम.



हाशिवरे येथील दत्तू बामा म्हात्रे यांच्या घरातील विराजमान श्रींची मूर्ती.



काळाचौकी येथील रहिवाशी सुयोग बांदिवडेकर यांच्या घरी विराजमान झालेली श्री गणरायाची मूर्ती. यंदाच्या वर्षी 'नैसर्गिक प्राणवायू' हा देखावा सादर करण्यात आला होता.



श्री. सुनील बळीराम खोत आणि परिवार ( कोल्हापूर ) यांच्या घरी विराजमान झालेली सुंदर गणेश मूर्ती



शिवशक्ती सार्वजनिक उत्सव मंडळ (लोअर परळ डिलाईरोड)



प्रफुल्ल रोहिदास पाटील (सरपंच) परहूर- कामार्ले, ता. अलिबाग जि. रायगड

साकी मोहिली सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ यंदा ५६ वे वर्ष गणेशोत्सव साजरा करत असून येथील गणेशोत्सव साकी मोहिलीचा राजा म्हणून विभागात प्रसिद्ध आहे. मंडळाचे अध्यक्ष दिनेश (अण्णा) देवाडीगा यांच्या नेतृत्वाखाली सर्व पदाधिकारी गणेशोत्सव यशस्वी करण्यासाठी मेहनत घेत आहेत. गणेशोत्सव निमित्त मंडळाच्या वतीने विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले जातात. शुक्रवारी श्री चरणी छपन्न भोग नैवाद अर्पण करण्यात आले होते. मंडळ वर्षभर सामाजिक उपक्रम राबवत असते.





चिं प्रतीक श्रीधर कुलकर्णी राहाता शिर्डी २०२४ मंगलमूर्ती मोरया



रविंद्र दाभोळे, F-26, प्रेमनगर कॉलनी, बी. जी. खेर मार्ग, वरळी, मुंबई - ४०० ०१८.



अंधेरीचा महागणपती - सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ, डी एन नगर, गणेश चौक, अंधेरी पश्चिम येथील आकर्षक गणरायांची मूर्ती. मंडळाचे प्रमुख मार्गदर्शक प्रकाश परब, अध्यक्ष संदीप खानविलकर, सरचिटणीस विनाय बावकर, कार्याध्यक्ष विक्रांत परब, खजिनदार अविनाश तोडणकर, प्रमुख सहचिटणीस प्रसाद परब



विकास को ऑप क्रेडिट सोसायटी लिमिटेडचे अध्यक्ष संजय बाळासाहेब गरूड यांच्या कुर्ला काजुपाडा येथील निवासस्थानी ११ दिवस श्री गणेशाचीमूर्ती स्थापना करण्यात आली आहे. गेली २४ वर्ष संजय गरुड आणि परिवार गणेशोत्सव साजरा करत असून भक्तिभावाने श्री ची पूजा अर्चा करत आहेत



विजय सदाशिव कामटेकर, भायखळा



रोहीत सदाशिव रहाटे, खटाव बिल्डींग, भायखळा



: 'गोळीबाराचा महाराजा' म्हणून ख्याती असलेल्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ, गणेश चौक, गोळीबार रोड, घाटकोपर पश्चिम येथे विराजमान झालेली सुवर्णमुकुटधारी श्री गणेशाची भव्य आणि विलोभनीय मूर्ती ! मंडळाचे यंदाचे ५७ वे वर्ष आहे.

चिंचपोकळी, आर्थर रोड नाका येथील आर्थर रोड सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ (आर्थर रोडचा विघ्नहर्ता) श्री गणेशाची मनमोहक मूर्ती . छाया - केतन खेडेकर





हिरलेकर परिवार, पुनम नगर, विरार पश्चिम.



सुशीला भाऊ परब, गाला मेन्शन, चिंचपोकळी पूर्व

तुषार सन्नके यांच्या सांताक्रूझ वैभव पॅराडाईज येथील निवासस्थानी श्रीची स्थापना करण्यात आली असून सन्नके कुटुंबीय आपल्या घरगुती गणपतीची सेवा पूजा अर्चा मनोभावे करत आहेत.





ओम शांती मित्र मंडळ, सेक्टर ६, शांती नगर मीरा रोड.



हिमांशु हेमंत वारंग ह्यांच्या घरचा बाप्पा दशक महोत्सवी वर्ष. (कुडाळ,नेरूर)




गुलमोहरचा गजानन - शिवसमर्थ मित्र मंडळ सार्वजनिक गणेशोत्सव, जेव्हीपीडी, अंधेरी पश्चिम येथील गणपती. मंडळाचे प्रमुख सल्लागार भूषण नाईक, अध्यक्ष हर्ष पारीख, उपाध्यक्ष अशोक करपन, सचिव जस्मित चांडोक, खजिनदार अरुण पार्टे, सहसचिव आकाश काळे. हे आहेत.



स्मित समीर सुतार लालबाग

जेव्हा एखाद्याला वाटत असेल आपण आयुष्यात एकही चूक केली नाही तेव्हा त्याने एकही नवीन गोष्ट करून पहिली नाही असे समजावे.



- अल्बर्ट आईन्स्टाईन
शास्त्रज्ञ


वृत्तमानस

मुंबई, रविवार, १५ सप्टेंबर २०२४


१६-०९-२०२४ ते २२-०९-२०२४ (रविवार ते शनिवार)




**मेष - संयम वाढवावा लाागेल.**
ग्रहप्रभाव पहाता प्रतिकुल सप्ताह जाऊ शकेल. कामे करतांना संयम बरा राहील.अडुन रहाण्यापेक्षा पर्यायीमार्ग शोधावा.या सर्व दिवसांत बोलतांना विचार करूनच बोलावे. कारण नसताना एखादी गोष्ट आंगलट येऊ शकते हे विस रु नये.इतरांच्या काही गोष्टी नाही पटल्या तरी त्या पटवून घ्याव्या लागतील.सध्या हो म्हणा व सोडून द्या प्रतिक्रिया देत बसू नका. उगाचच अडून बसू नका.१६चा कन्येततुन रविबदल वाद टाळन्यास सुचवतो.१८चा तुळेतला शुक्रबदल बदल बरा राहु शकेल. कमी पन गोड बोलत चलावे. व्यवसायात खरेदी विक्रीचे व्यवहार करताना भावनिक गोष्टी टाळा.नोकरदार वरिष्ठांच्या मर्जीने काम करावे.
**महिला -** वेळिच आर्थिक बचत करणे योग्य राहु शकल.उगाच कुटुंबात राग करू नका.जोडीदाराचा आदर करावा. आध्यात्मिक गोष्टीत गुंतून राहा.मानसिक शांतता जपावी.
**विद्यार्थी -** आरोग्याची काळजी घ्यावी.
**शुभदिनांक-१६-१७-१८.**

**वृषभ - समतोल राखणे बरे राहील.**
ग्रप्रभाव पहाता सप्ताहाचा पूर्वार्ध पोषक राहु शकेल.नियोजित कामे करतांना लाभाचे प्रमान वाढते राहु शकेल.कौटुंबिकस्तरावर वावरतांना बोलतांना संयम ठेवावाच लागेल.महत्वाचे निर्णय घेतांना सर्व दिवस जपून पाऊल टाकावे लागेल.एक गोष्ट लक्षात ठेवावी.जबरदस्तीने कोणती गोष्ट करायला गेलात तर कदाचित त्याचा त्रास वाढु शकतो. धीर धरलेला बरा राहील.कोणी काय करावे करू नये सल्ला देऊनका. व्यवहारात भावनिकता टाळा.रविबदल पोषकअसेल. शुक्रबदल बर्यापैकी पोषक राहु शकेल.व्यावसायिकदृष्ट्या थोडिशी पण यशस्वी धावपळ होऊ शकेल.नोकरदार वर्ग कामकाजात बरे बदल होऊ शकतील.
**महिला -** वायफळ खर्च कमी करावे लागतील.मुलांसाठी वेळ द्यावा लागेल.कौटुंबिक मतभेद दूर ठेवावे लागतील. जोडीदाराच्या साह्याने निर्णय घ्यावे.विचारपूर्वक वागावे.
**विद्यार्थी -** योग साधनेला महत्त्व द्या.
**शुभदिनांक१७-१८-१९.**

**मिथुन - पोषक आठवडा जाईल.**
ग्रहप्रभाव पहाता संपूर्ण सप्ताह लाभदायक जाऊ शकेल. नियोजित कामे करतांना उत्तम यश मिळवु शकाल.गरज नसतांना उगाचच स्पष्ट बोलणे टाळलेले पोषक राहील.सध्या आपण म्हणाल ती पूर्वदिशा असणार आहे.तरिसुध्दा समोरच्याचे म्हनने ऐकून घ्यावे लागेल. कौटुंबिकस्तरावर समाधानात उत्तम वाढ होईल. चांगली स्थितीअसेल. सामाजिक कामे करतांना योग्य नियोजन घेतले जाईल. प्रतिष्ठेत चांगली वाढ होऊ शकेल.गोडबोला लाभ होईल. शुक्रबदल पोषक होऊशकेल. रविबदल अचानकलाभ देईल.व्यवसायात उत्तमप्रगती होऊ शकेल. नोकरदार वर्गाला कामावर पूर्णपणे लक्ष केंद्रित करावे लागेल. यश मिळेल.
**महिला -** आर्थिकविवंचना सहजतेने दूर करु शकाल. समाजसेवेची आवड राहु शकेल. मुलांची प्रगती होऊ शकेल. उपस्थितिने घरगुती वातावरण आनंदी राहु शकेल.
**विद्यार्थी -** प्रकृती उत्तम असेल.
**शुभदिनांक-१९-२०-२१.**

**कर्क - यश मिळवु शकाल.**
ग्रहप्रभावपहाता सप्ताहाचा उत्तरार्ध चांगला जाऊ शकेल.नियोजित कामे करतांना यशाचे स्तर वाढवु शकाल.निर्णय घेतांना गोंधळुन जाऊ नका.कौटुंबिकस्तरावर वावरतांना चांगला प्रतिसाद मिळु शकेल.कोर्टकचेरितिल कामांनाचांगली गति मिळु शकेल.कदाचित मालकीहक्कही मिळु शकेल.सर्व कालावधी बर्यापैकी बरा राहील. या कालावधीमध्ये राहिलेली कामे होऊन जातील.तेव्हा त्वरेने कामे करण्याचा प्रयत्न करत चला.बुधबदल बर्यापैकी बरा राहु शकेल. शुक्रबदल यशस्वी करु शकेल.खर्चही वाढेल.व्यावसायिकदृष्ट्या केलेली गुंतवणूक फायद्याची ठरु शकेल. नोकरदार वर्ग वरिष्ठांची शाब्बासकी वेळीच मिळु शकेल.
**महिला -** शक्यतोविशेषआर्थिक चणचण भासणार नाही. घरामध्ये स्थावर मालमत्तेचा प्रश्न निकालात लागु शकेल. मालकी हक्क मिळेल. आरोग्याच्या तक्रारी दूर होतील.
**विद्यार्थी -** मनस्वास्थ्य लाभले.
**शुभदिनांक-१९-२०-२१.**

**सिंह - संघर्ष करावा लागेल.**
ग्रहसंकेत पहाताप्रतिकुल सप्ताह जाऊ शकेल.नियोजित कामे करतांना शांततेने व वेळेत पूर्ण करावे लागतील.सर्व दिवस संघर्षाचे असतील हे विसरु नये.कोणत्याही कामाची काळजी घ्यावी.बेफिकिरी चालणार नाही.कौटुंबिकस्तरावर वावरतांना कमी बोलणेच बरे राहील जबाबदारिला झटकुन चालनार नाही.सामाजिक कामे करतांना "तोंडात साखर व डोक्यावर बर्फ" हे यशाचे सुत्रअंमलात आणा.रागावर अंकुश ठेवावालागेल.बुधबदल खर्चकमी सुचवतोय.शुक्रबदल बराअसेल. नियंत्रण लाभास चांगले असेल.व्यवसायात आलेले प्रस्ताव भंपकच असु शकतील.नोकरदार वर्ग घेतलेली जबाबदारी पार पाडावीच लागेल.
**महिला -** मनमानी करु चालणारनाही.काटकसर करतआर्थिक बचत करावी लागेल.नातेवाईकांच्या कार्यक्रमानिमित्त होनार्या भेटीगाठी कटाक्षाने टाळाव्या लागतील.
**विद्यार्थी -** आरोग्य सांभाळावे लागेल.
**शुभदिनांक-२०-२१-२२.**

**कन्या - दडपन झटकुन टाकावे लागेल.**
ग्रहसंकेत पहाता पूर्वार्ध सप्ताहाचा चांगला जाऊ शकेल. नियोजित कामे करतांना अविश्वास कमी करावा लागेल.तरच उत्कर्षाचे वलय मजबुत होऊ शकेल.हे सर्व दिवस तसे बर्यापैकी बरे राहु शकतील.हा कालावधी धडाडीचा राहु शकेल.विश्वासाने प्रयत्न केल्यास चांगल्या कामासाठी जास्तवेळ लागणार नाही.धावपळ आता बर्यापैकी कामी येईल. थोडीशी कामातून उसंत घेता येऊ शकेल.निर्णय बरेहोतील.बुधबदल बर्यापैकी असुशकेल.शुक्रबदल पोषक राहील.आत्मविश्वास समाधानात वाढ करु शकेल.व्यवसायात चाललेल्या घडामोडींत जबाबदारीने पाऊल टाका.नोकरदार वर्गाचे कामकाज सुरळीत चालू राहील.
**महिला -** आर्थिक नियोजन मार्गी लागु शकेल. केलेले प्रयत्न यशात हळुवारपणे परिवर्तित होऊ शकतील.कदाचित राजकीय क्षेत्रात बर्यापैकी मानाचे स्थान मिळु शकेल.
**विद्यार्थी -** आरोग्य बरे राहील.
**शुभदिनांक-१६-१७-१८.**

**तूळ - लाभास पोषक आठवडा असेल.**
ग्रहसंकेत पहाता संपूर्ण सप्ताह लाभदायक जाऊ शकेल.नियोजित कामे करतांना उत्तम सफलता मिळवु शकाल.रखडलेली महत्त्वाची कामे सहज होतील.सर्वच दिवसांचा कालावधी उत्तम राहील.अचानक धनलाभ होऊ शकतील.चांगला कालावधी म्हणजे चांगल्या गोष्टी घडतात असे म्हणायला हरकत नाही.असेच चांगले वातावरण चालत आलेआहे. कोणत्याही गोष्टीसाठी संघर्ष करावा लागणार नाही महत्त्वाची कामे पूर्ण होतील.बुधबदल सर्वस्तरावर पोषक असेल.शुक्रबदल सर्वस्तरावर आनंदी करु शकेल. व्यवसायात हाती घेतलेले सर्व काम तडीस नेऊ शकाल. नोकरदार वर्गाला वरिष्ठांचे सहकार्य उत्तम मिळु शकेल.
**महिला -** आर्थिक बाबतीत समाधानाची बाब राहु शकेल. कौटुंबिक वातावरण आनंदी राहु शकेल.मानसिक समाधान लाभु शकेल.मनसोक्त खरेदि करु शकाल.
**विद्यार्थी -** शारीरिकत्रास दूर होईल.
**शुभदिनांक-१७-१८-१९.**

**वृश्चिक - व्यवहार जपून करावेत.**
ग्रहसंकेतपहाता उत्तरार्ध सप्ताहाचा चांगला जाऊ शकेल. नियोजितकामे करतांना चिडचिड करु नका.दिवस जरासे ताणतणावाचे असतील. ताणतणाव घेऊन कोणतीही गोष्ट साध्य होणार नाही.हे विसरु नये. त्यातून पर्यायी मार्ग काढणे खूप गरजेचे राहील.एकघाव दोनतुकडे करून चालणार नाही.शांतमार्गाने गोष्टी हाताळाव्या लागतील.सकारात्मक विचार करायची तयारी ठेवावी लागेल.म्हणजेनुकसान होणारनाही. बुधबदल चांगला राहु शकेल.शुक्रबदल बर्यापैकी बरा राहु शकेल.मधुर बोलणे कामे करु शकेल.व्यवसायात आवक-जावक बर्यापैकी बरा राहु शकेल.नोकरदार वर्ग कामातील तांत्रिक अडचणी दूर होऊ शकतील.
**महिला -** आर्थिक व्यवहार जपून केलेले बरे राहु शकेल. समाजमाध्यमांचा वापर जेवढ्यास तेवढा करत चला.जोडीदाराचीसाथ मिळु शकेल.सकारात्मक विचारांवर भर द्या.
**विद्यार्थी -** उत्साह वाढेल.
**शुभदिनांक-१९-२०-२१.**

**धनू - सहनशीलता वाढवावी.**
ग्रहबळ पहाता प्रतिकुल सप्ताह जाऊ शकेल.नियोजित कामे करतांना रागावर नियंत्रण ठेवणे बरे राहु शकेल.सप्ताहातील हे सर्व दिवस कसे संयमाने घालवता येतील ते पाहाणे उचीत ठरेल.काही गोष्टी तुमच्या मनाविरोधी घडू शकतात.रागाचा पारा अचानक चढू शकतो. नुकसानही होऊ शकते.एक गोष्ट लक्षात ठेवावे.आपण शांत राहणे खूप गरजेचेअसते.शांत राहिलात तर नुकसान होणार नाही.सहनशीलता वाढवा.बुधबदल सोम्यआहार सुचवतोय.शुक्रबदल आळस वाढवील. केलेलाबदल बरा राहु शकेल.व्यवसायात नियोजन यशस्वी करण्यासाठी धावपळ होईल.नोकरदार स्विकारलेल्या कामात व्यस्त राहावे लागेल.
**महिला -** फालतु खर्च वेळीच कमी करावे लागतील.जोडीदाराचा सल्ला घ्यावा लागे.आध्यात्मिक गोष्टीत गुंतून राहावे लागेल.नियमीत उपासनेवर वेळिचभर द्यावा लागेल.
**विद्यार्थी -** शारीरिक स्वास्थ्य जपा.
**शुभदिनांक-२०-२१-२२.**

**मकर - यशाचे गणीत जुळुन येईल.**
ग्रहबळ पहाता सप्ताहाचा पूर्वार्ध चांगला जाऊ शकेल.नियोजित कामे करतांना बर्यापैकी सफलता मिळु शकेल.यास्पाहात सर्व दिवसांचा कालावधी तसा बर्यापैकी बरा राहु शकेल.कौटुंबिकस्तरावर वावरतांना असे वातावरण आले आहे.तेव्हा उगाचच वेळ घालवु नका.त्याचा पुरेपूर वापर करून घ्यावा.जेकाम करायचे आहे आणि ते पूर्ण होत नाही त्याचा श्रीगणेशा आता करायला हरकत नाही.सध्या तुमचे काम बर्या पैकी होणार आहे.बुधबदल पोषक.शुक्रबदल भाग्यास बरा.वाद टाळन्यास संयम सुचवतो आहे.व्यवसायातून अपेक्षेपेक्षाही बरे प्रमाणात उत्पन्न मिळेल. नोकरदार वर्गाचीं कामे वेळेतच पूर्ण होऊ शकतील.
**महिला -** आर्थिक अडचण तितकिसी जाणवणार नाही. कदाचित राजकीय क्षेत्रात प्रतिष्ठा वाढु शकेल.नातेवाईकांशी जिव्हाळा वाढेल. मानसिक तणाव कमी होईल.
**विद्यार्थी -** आरोग्य मध्यम राहील.
**शुभदिनांक-१६-१७-१८.**


**कुंभ - यशस्वी आठवडा जाईल.**
ग्रहबळ पहाता संपूर्ण सप्ताह लाभदायक जाऊ शकेल.नियोजित कामे करतांना अनुकूल वातावरण असु शकेल.हा कालावधी उत्तम राहु शकेल. वरिष्ठांची चांगली मदत मिळु शकेल.कामाव्यतिरिक्त इतर गोष्टीत लक्ष घालायला वेळ मिळणार नाही.सर्व कामे साध्य होणारआहे.दुसऱ्याने केलेले मार्गदर्शन मोलाचे ठरणारआहे.कौटुंबिकस्तरावर वावरतांना आनंदीआनंद चोहिकडे असेअनुभव मिळु शकतील. प्रतिष्ठा वाढेल. बुधबदल वादापासुन दूरता सुचवतो आहे.शुक्रबदल लाभवाढवील. विचारबदल पोषक असेल. व्यवसायात लाभाचे प्रमाण उत्तम राहु शकेल. नोकरदार वर्ग काम करताना कोणतीही तडजोड स्वीकारु नका.
**महिला -** दडपन जाणवणार नाही.आर्थिक सफलता मिळु शकेल. राजकीय क्षेत्रात महत्त्वाच्या गोष्टीवर चर्चा होईल. घरगुती वलयअनुकूल असेल.मानसिक समाधान लाभेल.
**विद्यार्थी -** प्रकृती ठणठणीत असेल.
**शुभदिनांक-१७-१८-१९.**

**मीन - बर्यापैकी पोषक सप्ताह.**
ग्रहबळ पहाता सप्ताहाचा उत्तरार्ध चांगला जाऊ शकेल.
नियोजित कामे करतांना समाधानात हळुहळु वाढ होऊ शकेल.या सर्व दिवसांत निर्णय घेताना विचार करुन घेणे बरे राहील.घाईने निर्णय घेऊ नका.ज्या गोष्टीतून मनस्ताप होणार आहे तिथे शांतराहणे सर्वात उत्तम राहील.स्वत:च्या कामाची जबाबदारी इतरांवर टाकू नका.चांगल्या गोष्टींसाठी उशीर झाला तरी चालेल.हे ब्रीदवाक्य ध्यानी ठेवावे लागेल. तसा हा कालावधीही बरा असेल.बुधबदल पोषक असेल.शुक्रबदल पोषक.संयमबाळगा बरेराहील. व्यवसायातून बर्यापैकी मनासारखे उत्पन्न मिळु शकेल.नोकरदार वर्ग कदाचित अधिकार प्राप्ती होऊ शकेल.
**महिला -** आर्थिकप्रश्न बर्यापैकी मिटु शकल.कुटुंबातअसणारे मतभेद दूर होण्यासाठी प्रयत्न वाढवावे लागतील.नातेवाईकांच्या सुखदु:खात सहभागी व्हावे लागेल.
**विद्यार्थी -** प्रकृती जपत चला.
**शुभदिनांक-१९-२०-२१.**

# अलौकिक कामगिरीचे रचयीते - विश्वेश्वरय्या

आज १५ सप्टेंबर, आजचा दिवस संपूर्ण देशात अभियंता दिन म्हणून साजरा केला जातो कारण भारतातील पहिले अभियंता भारतरत्न सर मोक्षगुडम विश्वेश्वरय्या यांचा हा जन्मदिवस. मोक्षगुडम विश्वेश्वरय्या हे केवळ अभियंता नव्हते तर ते थोर देशभक्तही होते. आजच्या दिवशी म्हणजे १५ सप्टेंबर १८६१ रोजी कर्नाटकातील कोलार जिल्ह्यातील मदनहल्ली या छोट्याश्या गावात त्यांचा जन्म झाला. मोक्षगुडम विश्वेश्वरय्या यांचे वडील विद्वान संस्कृत पंडित होते. घरची परिस्थिती हलाखीची होती तरीही त्यांनी विश्वेश्वरय्या यांच्या शिक्षणात खंड पडू दिला नाही. यांनीही गरिबीशी झुंज देत तालुक्याला एकटे राहून आपले शिक्षण अव्वल गुणांनी पूर्ण केले.

शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर ते उच्च शिक्षणासाठी बंगळुरुला आले. तिथेही त्यांनी विशेष गुणवत्ता मिळवत बी ए केले. पदवीधर झाल्यावर त्यांना तांत्रिक शिक्षणाची आवड निर्माण झाली. पण तांत्रिक शिक्षण घेण्यासाठी पैसे नसल्याने त्यांनी म्हैसूरच्या राजाला विनंती केली. म्हैसूरच्या राजाने त्यांच्यातील गुणवत्ता हेरून त्यांना अभियांत्रिकी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देऊन पुण्याला पाठवले. विश्वेश्वरय्या यांनीही त्यांच्यावरील विश्वास सार्थ ठरवत अभियांत्रिकी परीक्षेत मुंबई प्रांतात प्रथम क्रमांक पटकावला. या त्यांच्या यशाची दखल घेऊन १८८४ साली सरकारने त्यांना सहाय्यक अभियंता या पदावर नेममुक दिली. तिथेही त्यांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला. या काळात त्यांनी खडकवासला धरणासाठी एक अभिनव अशा स्वयंचलित गेटची निर्मिती केली. यामुळे विशिष्ट पातळी वरील अतिरिक्त पाणीच वाहून जाई. अशाप्रकारच्या गेटची निर्मिती भारतात पहिल्यांदाच झाली होती. या डिझाइनचे नाव पुढे विश्वेश्वरय्या गेट असे झाले.



१९०७ साली त्यांनी सरकारी नोकरीतून निवृत्ती पत्करली. निवृत्तीनंतर निजाम सरकारने त्यांची विशेष सल्लागारपदी नियुक्ती केली. तिथे त्यांनी हैदराबाद परिसरातील दोन नद्यांवर धरणे बांधून हैदराबाद शहर पुरमुक्त केलेच शिवाय शहराचा कायापालट देखील केला. म्हैसूरच्या राजाने त्यांना मुख्य अभियंता पदाची ऑफर दिली त्यांनी ती स्वीकारली. म्हैसूरचे मुख्य अभियंता असताना त्यांनी तिथे कृष्णराज सागर धरण, वृंदावन गार्डन बांधले तसेच विकासाची अनेक कामे केली.

या व्यतिरिक्त त्यांनी उद्योग व शेती सिंचनाची अनेक कामे केली. पाण्याचा अपव्यय टाळून पुरेपूर वापर करणारी ब्लॉक सिस्टीम ही त्यांचीच देणगी आहे. म्हैसूरचे पद सोडल्यावर त्यांनी अभियांत्रिकीच नव्हे तर उद्योग, शेती, नगर सुधारणा या योजनेत मोलाचे कार्य केले. विश्वेश्वरय्या हे उच्चविद्याविभूषित असूनही त्यांचे राहणीमान अतिशय साधी होती. म्हैसूरी पद्धतीचा फेटा आणि साधी वेशभूषा त्यांनी शेवटपर्यंत जपली. त्यांचे व्यक्तिमत्त्वही आकर्षित करणारे होते. ते जितके साधे होते तितकेच ते परखडही होते. अंधश्रद्धा त्यांना मान्य नव्हती. मानवात देव आहे. मानव सेवा हीच ईश्वर सेवा असे त्यांचे मत होते. ते जसे बोलत तसे ते वागतही होते. वयाच्या ९४ व्या वर्षी भारत सरकारने त्यांना भारतरत्न या सर्वोच्च पुरस्काराने गौरविले. विश्वेश्वरय्या हे शतायुषी होऊन निरामय जीवन जगले. १४ एप्रिल १९६२ रोजी वयाच्या १०१ व्या वर्षी त्यांनी जगाचा निरोप घेतला. पण त्यांनी केलेल्या कार्यकर्तृत्वाचा गौरव व्हावा म्हणूनच आजचा दिवस संपूर्ण देशात अभियंता दिन म्हणून साजरा केला जातो. विश्वगुडम विश्वेश्वरय्या यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

- श्याम ठाणेदार
पुणे

## पत्र मानस

### पेंशन वाढीची मागणी पूर्ण व्हावी

चार पावले पुढे यायला हवे. हे वृत्तमानस दि. १४/९/२०२४ संपादकीय मध्ये आयुष्मान भारत संबंधी योजनेच्या अंमलबजावणी, त्रुटी आणि आर्थिक असुरक्षितेबद्दल ज्येष्ठ नागरिकांच्या व्यथा समरपक्तेने लिहिल्या बद्दल धन्यवाद. तरी आता आर्थिक दृष्ट्या सक्षमक्ता मिळवण्याकरीता इ पी एस १९९५ च्या ७४ लाख पेंशनरांची पेन्शनवाढीची मागणी सरकारने पूर्ण केल्यास, त्यांचेच पैसे त्यांना मिळाल्यास, ज्येष्ठांना आर्थिक दिलासा मिळेल.

**-विजय कदम, लोअर परळ.**

### न्यायालयाने पिंजऱ्यातील पोपटावर कारवाई करावी

'सीबीआयने पिंजऱ्यातील पोपट असल्यासारखे वागू नये', असे न्यायमूर्ती उज्ज्वल भुयान यांनी सीबीआयवर ताशेरे ओढले. केजरीवाल यांना अटक करण्याच्या 'सीबीआय'च्या कारवाईवर प्रश्नचिन्ह उपस्थित करुन त्यांना त्रास देण्याच्या उद्देशाने 'सीबीआय'ने ही कारवाई केल्याचे स्वतंत्र निरीक्षण न्यायाधीशांनी नोंदवले आहे. सीबीआय स्वतंत्र्य यंत्रणा असून देखील या तपास यंत्रणेवर जनमानसात दूषित ग्रह निर्माण झाला आहे.केंद्र सरकार देशातील तपास यंत्रणांचा राजकारणासाठी गैरवापर करत आहे.खासगी कंपन्यांकडून ला देणग्या मिळवून देण्यासाठी तपास यंत्रणांचा गैरवापर केला गेला. विरोधकांचा आवाज दाबण्यासाठी सत्ताधाऱ्यांकडून होत असलेल्या केंद्रीय तपास यंत्रणांचा गैरवापर होत आहे.सत्तेच्या मोहापोटी केंद्रीय तपास यंत्रणांचा गैरवापर करणे, पक्ष फोडाफोडीचे राजकारण करणे आणि चौकशांचा ससेमिरा मागे लावणे अशी प्रकरणे सुरु असल्याने केंद्र सरकार व सीबीआयवर कारवाई करावी.न्यायालयाने सीबीआयवर ताशेरे ओढणे, निरीक्षण नोंदवणे व प्रश्नचिन्ह उपस्थित करणे बंद करुन थेट करवाई करावी.सीबीआयच्या अशा कृतीमुळे गंभीर प्रश्न निर्माण होत आहेत. कारवाई झाली नाहीतर केंद्रीय तपास यंत्रणांचा गैरवापर सुरुच राहील.

**- विवेक तवटे , कळवा ,ठाणे**

### सुटका झाली पण अधिकाराचे काय ?

आम आदमी पार्टी यांचे सर्वेसर्वा आणि दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांची नुकतेच साडे तीन महिन्यांनी सर्वोच्च न्यायालयाने पुन्हा एकदा जामीनावर सुटका केलेली आहे. मागच्या खेपेला लोकसभा निवडणूकीच्या प्रचारासाठी सीएम केजरीवाल यांची जामीनावर सुटका झाली होती. पण यावेळी अनेक बंधने त्यांना घालून जामीन दिला असून मुख्यमंत्री पदाचे जवळपास सर्वच अधिकार न्यायालयाने नियंत्रित केले आहेत म्हणजेच थोडक्यात दिल्लीचे मुख्यमंत्री म्हणून कुठलीही फाईल सही करू शकत नाही कि कोणताही निर्णय घेऊ शकत नाही अशी विचित्र स्थिती निर्माण झाली आहे. इतिहासात प्रथमच तपास यंत्रणेने ऑन ड्युटी सीएम याना अटक करण्याचे धैर्य दाखवले आहे. आप हा देशातील सध्याचा एक नंबरचा विरोधी राजकीय राष्ट्रीय पक्ष असून काँग्रेसला पर्याय म्हणून देश पहात आहे. त्यामुळेच राज्याच्या हितासाठी तरी पक्षाला दुसरा सीएम देण्याबाबत नजीकच्या काळात निर्णय घ्यावाच लागेल असे वाटत आहे.

**- संजय गंगाराम साळगांवकर, कुर्ला**

### मावळातील ढोल पथक

राजगड ते शिवनेरी या दरम्यान पसरलेल्या मावळातुन जरी काही मंडळी रोजगारासाठी मुंबईत आली तरी मुंबईच्या धकाधकीच्या व धावपळीच्या जीवनामधुन त्यांनी आपली परंपरा,खेळ,संस्कृती मुंबईत जपली.मुंबईत पुणेरी ढोल पथक ही संकल्पनां खऱ्या अर्थाने सर्व प्रथम यांनीच आणली. कारण गावाकडे करमणूकीचे साधन म्हणजे ढोल पथक असतं. अनेक जण या ढोल पथकात असायचे. पण जस जसे गणपती उत्सवाचे स्वरूप पालटत गेले तस तसे या ढोल पथकांना मागणी वाढत गेली.त्यांना आर्थिक दृष्ट्या उर्जीत अवस्था प्राप्त झाली. आज मुंबईत गणपती पुढे एक तास वाजवायचे म्हणले की दहा ते पंधरा हजार रुपये पुणेरी ढोल पथकाला मिळतात. मावळातील या पथकांनी मावळची परंपरा जपण्याचे काम केले आहे.अशी शेकडोंनी पथके मावळ प्रांतात आहेत. गणेश उत्सवात या ढोल पथकांना मुंबई आणि पुण्यातून मोठी मागणी असते. मग मावळची ही वादक मंडळी पुण्या मुंबईत दहा दिवस मुक्काम ठोकुन असतात.पुण्या /मुंबईत एखादी खोली वा हॉल दोन आठवड्यांसाठी भाडय़ाने घेतला जातो. तिथे सगळी वाद्यं ठेवली जातात. खाद्य सामान गावाकडून आणले जाते. गहू, तांदूळ, डाळ, तिखट मसाला सोबत ठेवला जातो. भाडय़ाने घेतलेल्या खोलीत सामूहिकरीत्या स्वयंपाक बनवला जातो. सुपारीतून मिळणारे उत्पन्न प्रामुख्यांने सर्वांना समसमान वाटले जाते. काही मंडळ मात्र यांतील बराच चा पैसा गावांच्या समस्या सोडवण्यासाठी वापरतात.

**- सुभाष तळेकर, अध्यक्ष मुंबई डबेवाला असोसिएशन**

### अनुकरणीय सदुपयोग

आपल्या व्यवसायाचे स्वप्न पाहणाऱ्या आणि ते मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना द्वारे मिळालेल्या रकमेतून छोटेखानी व्यवसायाचा श्रीगणेशा करून यशस्वीपणे दीड हजाराचे दहा हजार रुपये करणाऱ्या कल्पकतेला, जिद्दीला आणि शासनाने दिलेल्या मदतीचा अत्यंत उत्तम प्रकारे सदुपयोग करणाऱ्या प्रणाली ताईला धन्यवाद देत असताना त्यांनी अन्य बहिणींना देखील परिवाराचे, जीवनाचे आयुष्य बदलू शकेल असा मार्ग दाखवला आहे.

**- विश्वनाथ पंडित, ठाणे** ■

## महानगरपालिकेच्या सुसज्ज व्यवस्थेत सातव्या दिवशी 3086 बाप्पांना भावपूर्ण निरोप

**नवी मुंबई :** नवी मुंबई महानगरपालिकेने 22 नैसर्गिक व 137 कृत्रिम विसर्जनस्थळी केलेल्या सुसज्ज विसर्जन व्यवस्थेमध्ये सातव्या दिवशी 3086 श्रीगणेशमूर्तींना भाविकांनी 'पुढच्या वर्षी लवकर या' अशा गजरात भावपूर्ण निरोप दिला. विशेष म्हणजे यात 333 शाडूच्या मूर्तींचा समावेश होता. पीओपी ऐवजी शाडूच्या मूर्तींची प्रतिष्ठापना करून पर्यावरणशील दृष्टीकोन जपणा-या गणेशभक्तांना विशेष प्रशस्तिपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. त्याचप्रमाणे 137 इतक्या मोठ्या संख्येने निर्माण केलेल्या कृत्रिम विसर्जन तलावात श्रीमूर्तींचे विसर्जन करणा-या 591 पर्यावरण जागरूक नागरिकांनाही कापडी पिशव्यांचे वितरण करून गौरविण्यात आले. महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी केलेल्या इकोफ्रेंडली प्लास्टिकमुक्त श्रीगणेशोत्सव' साजरा करण्याच्या आवाहनास पर्यावरण जागरूक नवी मुंबईकर नागरिकांनी चांगला प्रतिसाद दिला. सर्वच विसर्जन स्थळांवर आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली नागरिकांसाठी विविध सोयी पुरविण्यात आलेल्या होत्या.



## जादा परताव्याच्या अमीषाने कोट्यवधीची फसवणूक




**ठाणे :** जादा परताव्याच्या अमीषाने एकाची ६ कोटी २५ लाख रुपयांना फसवणूक करण्यात आल्याचा प्रकार ठाण्यात उघडकीस आला आहे. याप्रकरणी कापूरबावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याचा तपास आर्थिक गुन्हे अन्वेषण शाखेकडून सुरू आहे. फसवणूक झालेले व्यक्ती ठाण्यात वास्तव्यास आहेत. २०२० मध्ये त्यांची ओळख दोन भामट्यांसोबत झाली होती. आपली कंपनी गुंतवणूकीवर सात ते आठ टक्के दरमहा परतावा देते. तसेच या कंपनीकडे केंद्र शासनाचा परवाना असल्याची बतावणी भामट्याने केली. त्यामुळे फसवणूक झालेल्या व्यक्तीने नातेवाईक तसेच मित्र-मैत्रिणींकडून गुंतवणूकीसाठी पैसे घेतले. सुरुवातीच्या कालावधीत त्यांना परतावा मिळू लागला होता. परताव्यातील चार टक्के रक्कम फसवणूक झालेले व्यक्ती त्यांच्या गुंतवणूकदारांना देत होते. परतावा मिळत असल्याने फसवणूक झालेल्या व्यक्तीने संबंधित कंपनीत टप्प्याटप्प्याने ६ कोटी २५ लाख रुपयांची गुंतवणूक केली होती. मागील दीड वर्षांपासून त्यांना कोणताही परतावा प्राप्त झाला नव्हता. अखेर तक्रारदार यांनी याप्रकरणी ठाणे पोलिसांकडे तक्रार अर्ज केला. या तक्रारीच्या आधारे, मनिष मलकान आणि अर्पित शहा या दोन भामट्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर, याप्रकरणाचा तपास आर्थिक गुन्हे अन्वेषण शाखेकडून सुरू आहे.

# ठाण्यातील आनंद आश्रमात शिंदे शिवसेनेकडून नोटांची उधळण

प्रतिनिधी
■ **ठाणे**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे आनंद दिघे यांच्या नावाने राजकारण करत असतात. मात्र आता दिघे यांच्या आनंद आश्रमातून एक व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. या व्हिडिओमध्ये गणपती उत्सवात ढोल पथकावर पैसे उडवल्याचे दिसून येत आहे. मात्र, यावरून आता एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे. दिघेसाहेबांच्या आनंद आश्रमात नोटा उधळल्या, यातून दिघे साहेबांच्या समाजसेवेचे पवित्र नष्ट केले असल्याची टीका शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाने केली आहे.

तुम्ही आनंदाश्रमात नोटा उधळल्या यामुळे दिघे साहेबांच्या समाजसेवेची पावित्र नष्ट केले. आमचा आनंद हरपला, अशा शब्दात आनंद दिघे यांचे पुतणे केदार दिघे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे



यांच्या शिवसेनेवर निशाणा साधला आहे. अगामी विधानसभा निवडणुकीच्या माध्यमातून उद्धव ठाकरे गट केदार दिघे यांना एकनाथ शिंदे यांच्या विरोधात उमेदवारी देण्याची शक्यता वर्तवली जात आहे. या पार्श्वभूमीवर या घटनेला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

या संदर्भात एकनाथ शिंदे यांच्या गटाचे नेते नरेश म्हस्के यांनी देखील प्रतिक्रिया दिली आहे. दिघे साहेब ढोल पथकांना मोठ्या प्रमाणात बक्षीसांचे वाटप करत होते. मात्र, आनंद आश्रमात ज्या पद्धतीने नोटा उधळण्यात आल्या ती पद्धत चुकीची असल्याचे नरेश मस्के यांनी म्हटले आहे. या माध्यमातून नरेश मस्के यांनी एका अर्थाने पदाधिकाऱ्यांचे कान टोचले आहे.

आनंद दिघे आणि ठाणे यांचे एक जुने नाते आहे. आजही आनंद दिघे यांचा सन्मान करणारे अनेक नागरिक या परिसरामध्ये राहतात. 2001 मध्ये गणेश उत्सवाच्या काळात एका कार अपघातात आनंद दिघे यांचा मृत्यू झाला होता. वास्तविक अपघात झाल्यानंतर आनंद दिघे यांच्यावर ठाण्यातील एका रुग्णालयात उपचार सुरू होते. मात्र, त्यांना हृदयविकाराचा झटका आल्याने यादरम्यानच त्यांचा मृत्यू झाला होता. असे असले तरी ठाण्यामधील नागरिकांनाच्या मनात आनंद दिघे यांच्या विषयी अद्यापही आदर कायम आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे देखील आनंद दिघे यांच्या नावाने राजकारणात पुढे आले आहेत.दुसरीकडे, खासदार संजय राऊत यांनी या व्हिडिओवर तीव्र संताप व्यक्त केला आहे. ठाण्यातील आनंद आश्रमातील व्हिडिओ अत्यंत विचलित करणारा आहे. तो व्हिडिओ पाहून आम्ही अस्वस्थ झालो आहोत. आम्ही त्या वास्तूमध्ये धिंगाणा पाहिला. तिथे लुटीचा पैसा ठेवला जातो का? लुटीच्या पैशांतून असे प्रकार केले जात आहेत का? त्या ठिकाणी एक हंटर अडकवण्यात आला आहे. आनंद दिघे असते तर तो हंटर काढून लुटीचा पैसे उधळणाऱ्या लोकांना फोडून काढले असते. आनंद दिघे असे वागणाऱ्यांचा समर्थन करत नव्हते. तसेच जे आनंद दिघे यांना गुरू मानतात ते सुद्धा प्रकार करु शकत नाहीत, अशी टीका संजय राऊत यांनी यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर निशाणा साधताना केली

# तरुणीची छेड काढल्याने कल्याणमध्ये मोठा राडा

### दोन गटात तुंबळ हाणामारी, 5 जणांना अटक

प्रतिनिधी
■ **कल्याण**

कल्याण पूर्वेतील नवी गोविंदवाडी परिसरात एक धक्कादायक प्रकार घडला. तरुणीची छेड काढल्याचा आरोप करत दोन गटात भररस्त्यात तुफान राडा झाला. यावेळी झालेल्या हाणामारीत दोन्ही गटातील काहीजण जखमी झाले. या राड्यामुळे परिसरात तणावाचे वातावरण पसरले होते. घटनेची माहिती मिळताच टिळक नगर पोलिसांनी घटना स्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली. या प्रकरणी टिळक नगर पोलिस ठाण्यात दोन्ही गटाविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

पोलिसांनी दोन्ही गटातील ५ जणांना अटक केली असून अन्य आरोपींचा शोध सुरू आहे. मिळालेल्या माहितीनुसार, कल्याण पूर्वेतील नवी गोविंदवाडी परिसरात राहणाऱ्या एक तरुणीशी दोन तरुणांनी



छेडछाड केल्याचा आरोप करण्यात आला. जाकिर शेख आणि अरहम सय्यद अशी या तरुणांची नावे आहेत.

या दोघांनी तरुणीला तिचा मोबाइल नंबर देखील मागितला. मात्र, तरुणीने हा संपूर्ण प्रकार आपल्या कुटुंबियांना सांगितला. त्यानंतर तरुणीचे नातेवाईक जाब विचारण्यासाठी अरहम सय्यद याच्या घरी गेले. या दरम्यान तरुणीचे नातेवाईक आणि तरुणाच्या नातेवाईकांमध्ये जोरदार वाद झाला.

हा वाद इतका विकोपाला गेला की त्याचे रुपांतरण हाणामारीत झाले. याची माहिती टिळकनगर पोलिसाना मिळताच पोलिस तात्काळ घटना स्थळी दाखल झाले. परिसरात पोलीस बंदोबस्त तैनात करणे परिस्थिती नियंत्रणात आणली. याप्रकरणी टिळकनगर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरिक्षक विजय कदम यांनी दोन्ही गटाच्या विरोधात गुन्हे दाखल करण्यात आले आहे. जाकीर शेख, अरहम सय्यद यांना अटक करण्यात आली आहे. दुसऱ्या गटातील तीन जणांना देखील ताब्यात घेण्यात आलं आहे. या प्रकरणीतील अन्य आरोपीचा पोलिस शोध घेत आहे. सध्या परिसरात तणावपूर्व शांतता आहे.

# दिवा, भांडर्लीची जमीन होणार कचरामुक्त

### कचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावली जाणार

प्रतिनिधी
■ **दिवा**

दिवा आणि भांडर्ली परिसरातील कचराभुमी ठाणे महापालिकेने बंद केली असली तरी त्याठिकाणी कचऱ्याचे ढिग कायम असून या कचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावून तेथील जमीन पुर्वरत करण्यासाठी पालिका प्रशासनाने हालचाली सुरू केल्या आहेत. यामध्ये पहिल्या टप्प्यात २२ लाख मेट्रीक टनपैकी साडे आठ लाख मेट्रीक टन इतक्या कचऱ्याची शास्त्रोक्त विल्हेवाट लावून ही जमीन कचरामुक्त करून पुर्वीप्रमाणे केली जाणार आहे.

राज्य शासनाने ठाणे महापालिकेला कचरा भुमीसाठी भिवंडी येथील आतकोली भागात जागा देऊ केली असून येथे शास्त्रोक्त पद्धतीने कचरा विल्हेवाट प्रकल्प उभारणीसाठी पालिका प्रशासनाने हालचाली सुरू केल्या आहेत. त्याचबरोबर डायघर येथेही कचऱ्यापासून वीज निर्मीती करण्याचा प्रकल्प उभारण्यात येत आहे. हा प्रकल्प पुर्णपणे कार्यान्वित झालेला नसला तरी याठिकाणी कचरा वर्गीकरण करण्याचे काम सुरू झाले आहे. या दोन्ही ठिकाणी कचराभुमी होण्यापुर्वी पालिका प्रशासनाकडे हक्काची कचराभुमी नव्हती. यामुळे गेल्या कित्येक वर्षांपासून ठाणे महापालिका क्षेत्रात दररोज निर्माण होणारा ९५० मेट्रिक टन कचरा दिवा भागात टाकला जात होता. येथे कचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावण्यासाठी आवश्यक क्षमतेचे प्रकल्प उभारले नाहीत म्हणून हरीत लवाद आणि प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून पालिकेला वारंवार नोटीसा येत होत्या.

# हैद्राबाद मुक्तीसंग्राम दिनानिमित्त सत्याग्रह महाविद्यालयात परिसंवादाचे आयोजन

प्रतिनिधी
■ **नवी मुंबई**

हैद्राबाद मुक्तीसंग्राम लढयातील स्वातंत्र्य सैनिकांनी स्थापन केलेल्या राहुल शिक्षण प्रसारक मंडळ संचलित सत्याग्रह महाविद्यालयात हैद्राबाद मुक्ती संग्राम दिनाचे आयोजन मंगळवार, १७ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी ८.३० वाजता सुप्पारक भवन, प्लॉट नं ५२, सेक्टर – १९, खारघर, नवी मुंबई येथे करण्यात आले आहे. पुर्वश्रमित हैद्राबाद संस्थानात असलेल्या वर्तमान कालीन कल्याण-गुलबर्गा, तेलंगणा, मराठवाडा प्रदेशातून मुंबई महानगर प्रदेशात स्थलांतरीत झालेल्या निमंत्रीतांचा स्नेहमेळाव्याचे आयोजन केले आहे. ब्रिटीशांचा अमल असलेला भारत १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वतंत्र झाला. संस्थानिक भारत म्हणून ओळखला जाणाऱ्या ६६५ संस्थानिकापैकी हैद्राबाद संस्थानाच्या निजामाने स्वतंत्र हैद्राबाद राष्ट्र उभारण्यासाठी भारतात १५ ऑगस्ट १९४७ पुर्वी विलिन होण्यास नकार दिला. त्यामुळे निजाम चले जाव ही चळवळ पुर्वीच रामानंद तीर्थ स्वामी आणि शेडयुल्ड कास्ट फेडरेशनचे नेते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली सुरु झाली होती. १५ ऑगस्ट १९४७ नंतर मोठी गती मिळाली पोलीस ॲक्शन या नावाने तत्कालिन गृहमंत्री वल्लभाई पटेल आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे या कामी मोठे योगदान होते असे इतिहास काराचे म्हणणे आहे.

तसेच शुक्रवार २० सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ५ वेळात शांताबाई रामराव सभागृह, सत्याग्रह कॉलेज, सेक्टर – ७, खारघर, नवी मुंबई येथे एका राज्यस्तरीय परिसंवादाचे आयोजन या कॉलेजच्या वतीने करण्यात आले आहे. "मुंबई महानगर प्रदेशाचा भविष्यकालीन विकास तथा विकसित भारताच्या संकल्पपुर्ती साठीचे मनुष्यबळ : संधी, आव्हाने आणि डावपेच" या विषयावर परिसंवाद आहे. परिसंवादाचे उदघाटन पुज्य भदंन्त डॉ. उपगुप्त महाथेरो करणार आहेत. उदघाटक व प्रमुख पाहूणे म्हणून जे. पी डांगे (माजी मुख्य सचिव महाराष्ट्र शासन) आर. के. गायकवाड (माजी आयुक्त समाजकल्याण महाराष्ट्र राज्य) यांना पाचारण करण्यात आले आहे.

# कळंबोली वसाहतीत डासांची उत्पत्ती!

### डेंग्यू, मलेरियाच्या रुग्णसंख्येमधील वाढ चिंताजनक

प्रतिनिधी
■ **पनवेल**

पावसाळयाचे दिवस सुरू असल्याने कळंबोली वसाहतीमध्ये डासांची उत्पत्ती वाढली आहे. परिणामी डेंग्यू आणि मलेरियाचे रुग्ण वाढत आहेत. यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून महापालिकेने फवारणी करावी अशी मागणी शिवसेनेच्या वतीने शहर प्रमुख तुकाराम सरक यांनी केली आहे. त्यांनी या संदर्भात मनपा आयुक्तांना पत्र सुद्धा दिले आहे.

कळंबोली वसाहतीमध्ये लोकवस्ती मोठ्या प्रमाणात आहे. त्याचबरोबर या ठिकाणी सिडकोचे अल्पउत्पादन गटातील घरे आहेत. एलआयजी, के एल आणि ए टाईप





चे घरी आहेत. या व्यतिरिक्त रोडपाली परिसरामध्ये मोठमोठ्या इमारती आहेत. तसेच खाजगी बांधकाम व्यवसायिक आणि सिडको कडून पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत इमारतींचे बांधकाम सुरू आहे. याशिवाय रस्त्यांवर ठिकठिकाणी खड्डे असल्याने त्या ठिकाणी पाणी साचते. पावसाळी गटारांचे अनेक सेटर मधील झाकणे गायब आहेत. त्यामुळे त्यामध्ये सुद्धा पावसाचे पाणी एका जागेवर थांबते.


## बृहन्मुंबई महानगरपालिका

श्रीगणेशमूर्ती विसर्जनासाठी कृत्रिम तलावांच्या माहितीकरिता 'क्यूआर कोड' स्कॅन करा.

## कृत्रिम विसर्जन तलावांची विभागनिहाय माहिती

( टीप : या यादीमध्ये बदल संभवतो, तसेच काही ठिकाणी एकापेक्षा अधिक तलाव आहेत; याची कृपया नोंद घ्यावी.)



| विभाग | कृत्रिम विसर्जन तलावाचे ठिकाण |
|---|---|
| ए | • गेट वे ऑफ इंडिया.<br>• बॅक बे डेपो.<br>• बधवार पार्क.<br>• गीता नगर. |
| बी | • वीर संभाजी मैदान, नवरोजी हिल मार्ग क्र.५, मुंबई.<br>• जनाबाई रोकडे शाळा, माधवराव रोकडे मार्ग, मुंबई. |
| सी | • दुर्गादेवी उद्यान, ३ रा कुंभारवाडा, मुंबई.<br>• मुंबादेवी चौकी, मुंबादेवी, मुंबई.<br>• स. का. पाटील उद्यान, महर्षी कर्वे मार्ग, मुंबई. |
| डी | • ऑगस्ट क्रांती मैदान, ऑगस्ट क्रांती मार्ग, मुंबई.<br>• बाणगंगा तलाव, मलबार हिल, मुंबई.<br>• ताडदेव पोलीस वसाहत, मुंबई.<br>• ताडदेव, आर. टी. ओ., मुंबई.<br>• बी. आय. टी. चाळ, मुंबई सेंट्रल, केशवराव कदम मार्ग, मुंबई.<br>• नित्यानंद हॉटेल, आर. आर. मार्ग, मुंबई.<br>• गिल्डर लेन महानगरपालिका वसाहत, दादासाहेब भडकमकर मार्ग, मुंबई.<br>• भाऊसाहेब हिरे उद्यान, मुंबई सेंट्रल, मुंबई.<br>• खेतवाडी ६ वी गल्ली, मुंबई. |
| ई | • पानसरे चाळ, साने गुरुजी मार्ग (आर्थर रोड नाका), चिंचपोकळी (पश्चिम).<br>• आचरेकर उद्यान, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग, चिंचपोकळी (पूर्व).<br>• वीरमाता जिजाबाई भोसले उद्यान, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग, भायखळा.<br>• बाटलीबॉय मैदान, ए. जी. पवार लेन, घोडपदेव.<br>• डी. पी. वाडी मैदान, उमेश साळुंके मार्ग.<br>• गंगा बावडी मैदान पोलीस वसाहत, डॉकयार्ड रोड स्टेशन.<br>• एकनाथभाई बांदल मैदान, चिमनाजी राजूजी मार्ग.<br>• ताडवाडी बी. आय. टी. चाळ क्र. १२ येथील मैदान.<br>• मॉंटे साऊथ बिल्डिंग, बी. जे. मार्ग, भायखळा (पश्चिम).<br>• लाल मैदान, आग्रीपाडा.<br>• सात रस्ता सर्कल, वेलनेस फॉर्च्यून मेडिकल समोर.<br>• कामाठीपुरा एस. पी. मार्ग, १२ वी गल्ली येथील वी. आर. तुल्ला महानगरपालिका मैदान. |
| एफ उत्तर | • शीव तलाव (सायन तलाव)<br>• अशोक पिसाळ मैदान, प्रतिक्षा नगर.<br>• महर्षी कर्वे मैदान, वडाळा (पश्चिम).<br>• एस. डी. कॉर्पोरेशन, शीव प्रेरणा सहकारी गृहनिर्माण संस्था, भरणी नाका.<br>• ॲन्टॉप हिल वेअर हाऊसिंग कॉर्पोरेशन लिमिटेड, ॲन्टॉप हिल, वडाळा (पूर्व).<br>• वीर दडकर मैदान, लखमशी नप्पू मार्ग, माटुंगा (पूर्व).<br>• सिमेंट मैदान, ॲन्टॉप हिल. |
| एफ दक्षिण | • भवानीमाता क्रीडांगण, शिंदेवाडी, दादर (पूर्व).<br>• सदाकांत ढवण मैदान, गोविंदजी केणी मार्ग, भोईवाडा, परळ.<br>• बेळगाव कारवार सह संयुक्त महाराष्ट्र संघर्ष स्मृती योजना मनोरंजन उद्यान, हिंदू स्मशान भूमी मार्ग क्र.-३९, भोईवाडा, परळ.<br>• प्रबोधनकार ठाकरे उद्यान, आचार्य दोंदे मार्ग, शिवडी.<br>• मातोश्री इमारत क्र.-६, जेरबाई वाडिया मार्ग, भोईवाडा, परळ.<br>• कामगार मैदान, गोखले सोसायटी लेन, आर. एम. भट्ट शाळेजवळ, परळ.<br>• मनोरंजन मैदान, गॅस कंपनी लेन, गुंदेचा गार्डन जवळ, चिंचपोकळी.<br>• सद्गुरू भालचंद्र मैदान, अनंत मालवणकर मार्ग, गणेश टॉकीज जवळ, लालबाग.<br>• गोदरेज मैदान, गुंदेचा गार्डन जवळ, परळ.<br>• लाल ओटा मैदान, एन. एल. परळकर मार्ग, परळ गाव.<br>• देवजी परब मैदान, दत्ताराम लाड मार्ग, परळ.<br>• बेस्ट वसाहत मैदान, 'ओ' ब्लॉक समोर, लालबाग.<br>• शहीद भगतसिंग मैदान, अभ्युदय नगर, काळाचौकी.<br>• विनायक वाबळे मैदान, टी. जे. रोड, स्वान मिल जवळ, शिवडी.<br>• बाल विकास मनोरंजन मैदान, रामटेकडी मार्ग, शिवडी. |
| जी उत्तर | • मृदुंगाचार्य नारायण राव कोळी मैदान, एस. एल. रहेजा मार्ग, फिशरमन कॉलनी, माहिम (प.).<br>• मोरी मार्ग शाळा, दत्त मैदान, सुनावाला अग्यारी रोड, माहिम (पश्चिम).<br>• शाहूनगर मैदान, धारावी.<br>• शिवराज मैदान, संत कक्कय्या मार्ग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलेज जवळ, धारावी.<br>• लोकमान्य मैदान, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, माहिम (पश्चिम).<br>• वल्लभ सोसायटीच्या समोर, ९० फुटी मार्ग, धारावी, मुंबई.<br>• पर्ल रेसिडेन्सी सोसायटी, संत रोहिदास मार्ग, धारावी.<br>• महानगरपालिका क्रीडा भवन, छत्रपती शिवाजी महाराज मैदान, स्वातंत्र्यवीर सावरकर मार्ग.<br>• चौधरी वाडी मैदान, एस. के. बोले छेद मार्ग, दादर.<br>• केशवराव दाते उद्यान, आगाशे पथ, दादर (पश्चिम). |

| विभाग | कृत्रिम विसर्जन तलावाचे ठिकाण |
|---|---|
| जी उत्तर | • ओम समर्थ व्यायाम मंदिर, बालगोविंददास मार्ग, दादर (पश्चिम).<br>• डॉ. बाबासाहेब आंबेडकर मैदान, जस्मिन मिल मार्ग, माटुंगा लेबर कॅम्प, मुंबई. |
| जी दक्षिण | • चवन्नी गल्ली मैदान, मुरारी घाग मार्ग.<br>• आदर्शनगर स्पोर्ट्स क्लब मैदान, वरळी .<br>• राजाभाऊ साळवी मैदान, नवीन प्रभादेवी मार्ग.<br>• डॉ. बाबासाहेब आंबेडकर महानगरपालिका शाळा मैदान, बी. डी. डी. चाळ, वरळी.<br>• वीर नेताजी सुभाष मैदान, बी. डी. डी. चाळ, वरळी.<br>• महात्मा गांधी मैदान (जांभोरी मैदान), जी. एम. भोसले मार्ग.<br>• स्व. दत्ताजी नलावडे मनोरंजन मैदान, गणपतराव कदम मार्ग.<br>• महाराष्ट्र हायस्कूल मैदान, ना. म. जोशी मार्ग.<br>• फिनिक्स मॉल जवळील भूखंड, सेनापती बापट मार्ग. |
| एच पूर्व | • प्रभाग क्र. ९५ मधील खेरवाडी म्युनिसिपल परिरक्षण चौकी, खेरवाडी जंक्शन, वांद्रे (पूर्व).<br>• प्रभाग क्र. ९३ मधील चेतना महाविद्यालयाजवळ शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व).<br>• प्रभाग क्र. ९० मधील कलीना टँक, जोसेफ (काका) बाप्टिस्टा उद्यान, कलीना, सांताक्रूझ (पूर्व).<br>• प्रभाग क्र. ८७ मधील गोळीबार महानगरपालिका शाळा, गोळीबार मार्ग नं. ६, सांताक्रूझ (पूर्व). |
| एच पश्चिम | • प्रभाग क्र. ९८ मधील मुक्तानंद उद्यान, सरस्वती मार्ग, सांताक्रूझ (पश्चिम). |
| के पूर्व | • स्टर्लिंग कोर्ट सोसायटी, कोंडीविटे मार्ग, एम. आय. डी. सी., अंधेरी (पूर्व).<br>• हसनत स्कूल जवळ, चर्च मार्ग.<br>• त्रिकोणी मैदान.<br>• न. भू. क्र. ३६८/२९४, जिजामाता मार्ग.<br>• राजर्षी शाहू महाराज मार्ग, रमेश मोरे पार्क, अंधेरी- कुर्ला मार्ग, अंधेरी (पूर्व).<br>• डॉ. हेडगेवार मैदान, हनुमान मार्ग, विलेपार्ले (पूर्व).<br>• न. भू. क्र. ४१८, शहाजी राजे स्कूलजवळ, शहाजी राजे मार्ग, विलेपार्ले (पूर्व).<br>• महाकाली गुंफा मार्ग, एम. आय. डी. सी., अंधेरी (पूर्व) |
| के पश्चिम | • लोखंडवाला कॉम्प्लेक्स मागील मार्ग, अंधेरी (पश्चिम).<br>• शहाजी राजे क्रीडा संकुल (अंधेरी स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स), अंधेरी (पश्चिम).<br>• रावजी मैदान, सहकार मार्ग, जोगेश्वरी (पश्चिम).<br>• संत रामदास मैदान, भरडावाडी मार्ग, अंधेरी (पश्चिम).<br>• सरदार वल्लभभाई पटेल उद्यान, लल्लूभाई उद्यान, विलेपार्ले (पश्चिम).<br>• धनजीभाई मेहता मैदान, विलेपार्ले (पश्चिम).<br>• नोवोटेल हॉटेलजवळ. |
| पी उत्तर | • पी उत्तर विभाग कार्यालय मैदान, लिबर्टी मैदान, मालाड (पश्चिम).<br>• राजे शहाजी क्रीडांगण, मालाड (पश्चिम).<br>• सी. जी. पी. मैदान, ओर्लेम, मार्वे मार्ग, मालाड (पश्चिम).<br>• म. वा. देसाई मैदान, मार्वे मार्ग, मालाड (पश्चिम).<br>• छत्रपती शिवाजी राजे संकुल, जनकल्याण नगर, मालाड (पश्चिम).<br>• एम. एच. बी. कॉलनी, महानगरपालिका शाळा, मालवणी गेट क्र. ७, मालाड (पश्चिम).<br>• बुवा साळवी मैदान, मालाड (पूर्व).<br>• रामलीला मैदान, मालाड (पूर्व).<br>• मॉंसाहेब मीनाताई ठाकरे मैदान, मालाड (पूर्व).<br>• पुष्पा पार्क, टोपीवाला स्कूल मैदान, मालाड (पूर्व).<br>• सममित्र मैदान, मालाड (पूर्व). |
| पी दक्षिण | • उन्नत नगर महानगरपालिका शाळा मैदान, गोरेगाव (पश्चिम).<br>• अण्णा भाऊ साठे मैदान, कृत्रिम तलाव, गोरेगाव (पश्चिम).<br>• न. भू. क्र. ९०२, सीताराम पाटकर मार्ग, गोरेगाव (पश्चिम).<br>• महानगरपालिका मैदान, अहिंसा उद्यान समोर, गोरेगाव (पश्चिम).<br>• विंडमेअर सोसायटी जवळ, दीनदयाल उपाध्याय उद्यानाजवळ, गोरेगाव (पश्चिम).<br>• फिरते विसर्जन स्थळ, राम मंदिर, गोरेगाव (पश्चिम).<br>• आरे भास्कर मैदान, आरे भास्कर मार्ग, गोकुळधाम, गोरेगाव (पूर्व).<br>• बिंबीसार नगर, महानगरपालिका शाळा, गोरेगाव (पूर्व).<br>• लक्ष्मण नगर मैदान, घासबाजार मार्ग, गोरेगाव (पूर्व).<br>• अप्पर गोविंद नगर मैदान, पोद्दार महाविद्यालयाजवळ, गोरेगाव (पूर्व).<br>• सोनावाला छेद मार्ग क्र. २, महानगरपालिका भूखंड, जिंजर हॉटेल जवळ, गोरेगाव (पूर्व).<br>• दिनकरराव देसाई मार्ग (आरे रोड), फिरते कृत्रिम तलाव क्र. १, गोरेगाव (पूर्व).<br>• दिनकरराव देसाई मार्ग (आरे रोड), फिरते कृत्रिम तलाव क्र. २, गोरेगाव (पूर्व).<br>• दिनकरराव देसाई मार्ग (आरे रोड), फिरते कृत्रिम तलाव क्र. ३, गोरेगाव (पूर्व).<br>• दिनकरराव देसाई मार्ग (आरे रोड), फिरते कृत्रिम तलाव क्र. ४, गोरेगाव (पूर्व).<br>• दिनकरराव देसाई मार्ग (आरे रोड), फिरते कृत्रिम तलाव क्र. ५, गोरेगाव (पूर्व).<br>• दिनकरराव देसाई मार्ग (आरे रोड), फिरते कृत्रिम तलाव क्र. ६, गोरेगाव (पूर्व).<br>• आरे तलावाजवळील वाहनतळ येथे तात्पुरते कृत्रिम विसर्जन तलाव, गोरेगाव (पूर्व). |
| आर उत्तर | • न. भू. क्र. ५५१ अ, वाय.सी.एम. मैदानाच्या जवळील महानगरपालिका मैदान, दहिसर (पश्चिम).<br>• दहिसर स्पोर्ट्स फाऊंडेशन, सी.एस. मार्ग, दहिसर (पूर्व), मुंबई.<br>• प. पू. पांडुरंग शास्त्री आठवले मैदान, संत चोखामेळा मार्ग, दहिसर (पूर्व), मुंबई. |

| विभाग | कृत्रिम विसर्जन तलावाचे ठिकाण |
|---|---|
| आर उत्तर | • सुहासिनी पावसकर मार्गालगत क्रेसिंटा इमारतीच्या बाजूची महानगरपालिकेची मोकळी जागा, दहिसर (पूर्व), मुंबई - ४०० ०६८.<br>• युनिव्हर्सल शाळेच्या खेळाच्या मैदानासमोर, अशोकवन, दहिसर (पूर्व), मुंबई.<br>• पी. सी. ओ. चौकी, वाय. आर. तावडे मार्ग, दहिसर (पूर्व), मुंबई.<br>• तावडेवाडी, जयवंत सावंत मार्ग, दहिसर (पश्चिम), मुंबई.<br>• कल्पना चावला मार्ग, नारायण शाळेजवळील महानगरपालिका खेळाचे मैदान, दहिसर (पश्चिम) |
| आर मध्य | • नागरी प्रशिक्षण केंद्र, अभिनव नगर, बोरिवली (पूर्व).<br>• अनंतराव भोसले उद्यान, बोरिवली (पूर्व).<br>• आर. जी. प्लॉट क्र. १६२/सी, सुस्वागत हॉटेल जवळ, बोरिवली (पूर्व).<br>• रवीशंकर शाळेजवळील पी. जी. प्लॉट, कुलुपवाडी, बोरिवली (पूर्व).<br>• संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरिवली (पूर्व).<br>• जनरल अरुणकुमार वैद्य मैदान, एल. टी मार्ग, बोरिवली (पश्चिम).<br>• नायतोडी मैदान, योगी नगर, बोरिवली (पश्चिम).<br>• पावनधाम मागील भूखंड, सत्य नगर, बोरिवली (पश्चिम).<br>• नागदेव ओंकारेश्वर उद्यानाजवळील म्हाडाचा भूखंड, सेक्टर-३, चारकोप, बोरिवली (पश्चिम).<br>• गोराई राजा मैदान, गोराई-१, बोरिवली (पश्चिम).<br>• चारकोप सेक्टर ४ येथील महानगरपालिका शाळेचे मैदान, बोरिवली (पश्चिम).<br>• छत्रपती शिवाजी महाराज क्रीडांगण, गोराई, बोरिवली (पश्चिम). |
| आर दक्षिण | • मीना सुतार मार्ग, आर दक्षिण विभाग कार्यालयाच्या मागे, कांदिवली (पश्चिम).<br>• राजीव गांधी खेळाचे मैदान, रायन शाळेजवळ, ठाकूर संकूल, कांदिवली (पूर्व).<br>• सलीम कंपाउंड, आकुर्ली मार्ग, कांदिवली (पूर्व).<br>• महाराणा प्रताप उद्यान, १२० फुटी मार्ग, लोखंडवाला, कांदिवली (पूर्व).<br>• चारकोप सेक्टर १, छत्रपती शिवाजी महाराज मैदान, कांदिवली (पश्चिम).<br>• चारकोप सेक्टर २, दादोजी कोंडदेव मैदान, कांदिवली (पश्चिम).<br>• म्हाडा मैदान, एकता नगर मार्ग, गोसालिया मार्ग जवळ, कांदिवली (पश्चिम).<br>• कदमवाडी मैदान, महावीर नगर, कांदिवली (पश्चिम).<br>• प्रभावतीदेवी ठाकूर खेळाचे मैदान, ठाकूर गाव, कांदिवली (पूर्व).<br>• दादोजी कोंडदेव खेळाचे मैदान, ठाकूर गाव, कांदिवली (पूर्व).<br>• महानगरपालिका परिरक्षण चौकी, आकुर्ली छेद रस्ता क्र. ३, कांदिवली (पूर्व).<br>• महानगरपालिका खेळाचे मैदान, अशोक नगर मार्ग आणि आत्मीय मार्ग जंक्शन, कांदिवली (पूर्व). |
| एल विभाग | • प्रभाग क्र. १५६ मधील बामनदया खेळाचे मैदान, पवई.<br>• प्रभाग क्र. १५७ मधील न. भू. क्र. २९ ई/२९ एफ, विजय फायर मार्ग, चांदिवली.<br>• प्रभाग क्र. १६९ मधील छत्रपती शिवाजी मैदान, नेहरु नगर, कुर्ला (पूर्व).<br>• प्रभाग क्र. १७१ मधील छत्रपती शिवाजी मैदान, चुनाभट्टी (पूर्व). |
| एम पूर्व | • ३९६ टेनामेंट प्लॉट, देवनार वसाहत, गोवंडी. |
| एम पश्चिम | • महानगरपालिका मैदान, टिळक नगर.<br>• गांधी मैदान, चेंबूर.<br>• जेतवन उद्यान, ठक्कर बाप्पा कॉलनी.<br>• महानगरपालिका उद्यान, भक्ती पार्क. |
| एन विभाग | • शिवाजी मैदान, पार्क साईट, विक्रोळी (पश्चिम).<br>• मार्केट प्लॉट, रस्ता क्र - १७, विक्रोळी (पश्चिम).<br>• साई निवारा म्हाडा ले आऊट, पूर्व द्रुतगती महामार्ग, घाटकोपर (पूर्व).<br>• बाबू गेनू मैदान, घाटकोपर (पश्चिम).<br>• दत्ताजी साळवी मैदान, भटवाडी, घाटकोपर (पश्चिम).<br>• आचार्य अत्रे मैदान, पंतनगर, घाटकोपर (पूर्व).<br>• मानेकलाल इस्टेट, ९० फुटी मार्ग, घाटकोपर (पश्चिम). |
| एस विभाग | • श्रीरामपाडा मैदान, बी. एम. सी. चौकी, श्रीरामपाडा, भांडुप (पश्चिम).<br>• कैलास पार्क, तुळशेतपाडा, भांडुप (पश्चिम).<br>• गुरु गोविंदसिंग मैदान, कुकरेजा संकुल मार्ग, व्हिलेज मार्ग, भांडुप (पश्चिम).<br>• ब्युटी हाईट्स जवळ, गावदेवी मार्ग, भांडुप (पश्चिम).<br>• श्रीराम पार्क बिल्डिंग समोर, कै. अशोक केदारे चौक, भांडुप (पश्चिम).<br>• क्रिटिकेअर हॉस्पिटल जवळ, कोकण नगर, भांडुप (पश्चिम).<br>• स्कायलाईन इमारत, ९० फुटी मार्ग, महाराष्ट्र नगर, भांडुप (पश्चिम).<br>• परिवार उद्यान, कांजुरमार्ग पोलीस ठाणे, कांजुरमार्ग (पूर्व).<br>• बालगंधर्व मैदान, कन्नमवार नगर, विक्रोळी (पूर्व).<br>• इमारत क्र. ४१६, विद्यामंदिर शाळा, टागोर नगर, विक्रोळी (पूर्व).<br>• डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान, सुरवडे मार्ग, टागोर नगर, विक्रोळी (पूर्व).<br>• मोरारजी नगर, जलवाहिनी जवळ, त्रिकोणी उद्यान, कैलाश नगर, साकी विहार मार्ग, पवई.<br>• तिरंदाज शाळेजवळील मोकळा भूभाग, पवई. |
| टी विभाग | • स्वप्ननगरी, सरदार तारासिंग उद्यान, मुलुंड वसाहत, मुलुंड (पश्चिम).<br>• न. भू. क्र. - १४४, क्रीडा संकुल, वीर सावरकर मार्ग, मुलुंड (पूर्व).<br>• सुरेश बारकू पाटील उद्यान, ए.सी.सी. मार्ग, मुलुंड (पश्चिम).<br>• कालीदास नाट्यगृह, पी. के. मार्ग, मुलुंड (पश्चिम). |

PRO/1211/ADV/2024-25

उप आयुक्त ( परिमंडळ - २)
तथा गणेशोत्सवाचे समन्वयक

वृत्तमानस
महाराष्ट्र
मुंबई, रविवार, १५ सप्टेंबर २०२४

## पुण्यात DJ च्या आवाजामुळे दुकानाच्या फुटल्या काचा

**पुणे :** पुण्यात डीजेचा दणदणाट पहायला मिळत आहे. गणपती विसर्जन मिरवणुकीत कर्णकर्कश आवाजात डीजे लावण्यात आल्या. डीजेच्या आवाजामुळे दुकानाच्या काचा फुटल्या आहेत. यामुळे दुकानदारांचे नुकसान झाले आहे. पुण्याच्या भोरमध्ये डीजेच्या दणदणाटात निघालेल्या गणपती विसर्जन मिरवणुकी दरम्यान आवाजामुळे अनेकांना त्रास झाला. डीजेच्या दणदणाटामुळे काही दुकानाचे नुकसान झाले आहे. डीजे साऊंडच्या हादऱ्याने दुकानांमधील मांडणीवर ठेवलेल्या काचेच्या बरण्या जमिनीवर पडून फुटल्यानं त्यातील मालाचे नुकसान झाले. तसेच दुकानांमधील कपाटला असलेल्या शटरच्या काचाही तडे जाऊन फुटल्या आहेत.शहरांमधील घरांमध्येही डीजेच्या आवाजाचे हादरे बसले आबेत. डीजेच्या दणदणाटाला नागरिक त्रस्त झाले आहेत. याबाबत नागरिक नाराजी व्यक्त करत आहेत. मिरवणुकांमध्ये ढोल ताशा सारख्या पारंपारिक वाद्यांना प्राधान्य देऊन, डीजेचा दणदाणाट बंद करावा किंवा डीजे साऊंड सिस्टिमला आवाजाची मर्यादा घालून द्यावी अशी मागणी नागरिकांनी केली आहे.



## म ह त्त्वा चे

### 10 लाख रुपये दंड, न भरल्यास एक वर्ष सक्तमजुरी

**पुणे :** पुणे ग्रामीण जिल्हयात यवत पोलीस स्टेशनच्या हद्दीत दौंड तालुक्यात राहु या गावात पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक शाखेत सशस्त्र दरोडा टाकून बँकेतून ६५ लाख रुपयांची रोख रक्कम दरोडेखोरांनी चोरुन नेली होती. याप्रकरणी गुन्हा दाखल झाल्यानंतर स्थानिक गुन्हे शाखे व यवत पोलिसांनी तपास करत, सतीश आप्पासाहेब इथापे टोळीस अटक केली. त्यांच्यावर मोक्का अंर्तगत दहा आरोपींवर कारवाई करण्यात आली होती. याबाबतची सुनावणी शिवाजीनगर न्यायालयात होऊन विशेष न्यायालयाने चार आरोपींना जन्मठेपचची व प्रत्येकी दहा लाख रुपये दंडाची व दंड न भरल्यास एक वर्ष सक्तमजुरीची शिक्षा सुनावली आहे. तर, तीन आरोपींना सात वर्ष सक्तमजुरी व १० लाख रुपये दंड व दंड न भरल्यास एक वर्ष सक्तमजुरी शिक्षा सुनावण्यात आली आहे. सचिन आप्पा ऊर्फ आप्पासाहेब ऊर्फ भाऊसाहेब इथापे ऊर्फ शिवाजी आप्पा पाटील, रामदास ऊर्फ पप्पु ऊर्फ झिंग्या ऊर्फ समीर यशवंत ढगे, पृथ्वीराज ूर्फ पतंग दत्तात्र्य माने, मारुती ऊर्फ पिंटया शिवाजी सरडे या आरोपींना जन्मठेप शिक्षा सुनावण्यात आली आहे. तर, सतीश आप्पा इथापे ऊर्फ सतीश आप्पा पाटील, मंगल आप्पा इथापे, प्रियंका ज्ञानेश्वर ऊर्फ माऊली लोकरे ऊर्फ प्रियंका दिपक देशमुख या आरोपींना सात वर्षाची शिक्षा सुनावण्यात आली आहे.

### शहरात दोघींचा विनयभंग; गुन्हे दाखल

**पिंपरी :** गेल्या काही दिवसांमध्ये शहरात विनयभंगाचे प्रकार लक्षणीयरित्या वाढले आहेत. पुन्हा दोन घटना घडल्या असून, दोघींचा केल्याप्रकरणी दोघांविरोधात गुन्हे दाखल केले आहेत. अंबड औद्योगीक वसाहतीतील १३ वर्षीय अल्पवयीन पीडितेच्या फिर्यादीनुसार, संशयित सतिश दहाडे याने बुधवारी (ता. ४) पीडितेचा विनयभंग केला. पीडिता शाळेतून परतत असताना संशयिताने तिचा पाठलाग करीत तिच्या अंगावर कागदी चिठ्ठ्या फेकून वाट अडविली.त्यावेळी संशयिताने, तू जर बोलली नाही तर आत्महत्या करील, अशी धमकी देत विनयभंग केला. याबाबत अंबड पोलीसात गुन्हा दाखल केला असून अधिक तपास उपनिरीक्षक संदीप पवार करीत आहेत. दुसरा प्रकार सिन्नर फाटा परिसरातील खर्जुल मळा याठिकाणी घडला आहे. राहूल केदार (२५) असे संशयित युवकाचे नाव आहे.माझ्याशी मैत्री कर असे म्हणत विनयभंग केला. याप्रकरणी नाशिकरोड पोलीसात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सहाय्यक निरीक्षक कोरडे करीत आहेत.

### अंथरुणात लघुशंका केल्याने सावत्र आईने दिले मुलीला चटके

**कोल्हापूर :** एखादी सावत्र आई एखाद्या मुलीसंदर्भात काय करु शकते? त्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. पाच वर्षांच्या लहान मुलीने झोपेत अंथरुणात लघुशंका केली. मग त्या मातेचा राग अनावर झाला. त्या सावत्र आईने मग उलाथणे तापवले. त्या लहान मुलीच्या गालावर, ओठावर, तोंडावर, गळ्याजवळ उलाथण्याने चटके दिले. कोल्हापूर शहरातील हातकणंगले तालुक्यातील कासारवाडी येथे हा प्रकार घडला. त्या सावत्र आईविरोधात शिरोली एमआयडीसी पोलिसात तक्रार दाखल करण्यात आली आहे. पुजा शुभम मगरे असे त्या महिलेचे नाव आहे.

## संभाजीनगरमधील हिट अँड रन अपघातात चौघांचा मृत्यू

### गाडीचा परवाना न बाळगता मद्यधुंद अवस्थेतील चालकाला अटक

प्रतिनिधी
■ संभाजीनगर

दहा वर्ष घरात पाळणा हालत नव्हता, अपत्य प्राप्तीसाठी सगळे प्रयत्न सुरु होते. देवाला नवसही केले. अखेर १० वर्षांनी घरी चिमुकल्या पावलांचे आगमन झाले अन् अमरावतीच्या देसकर कुटुंबात आनंदाचे वातावरण पसरले. पण हा आनंद देवाने सहा महिन्यातच हिरावून घेतला. दहा वर्षांनी झालेल्या या चिमुकल्याच्या बारशाचा कार्यक्रम आटोपून येताना भयंकर अपघात झाला. या अपघातात चिमुकल्या लेकासह चौघांचा मृत्यू झाला. छत्रपती संभाजीनगरमध्ये घडलेल्या या काळीज पिळवटून टाकणाऱ्या घटनेने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, मुळचे अमरावतीचे असणारे अजय देसकर आणि त्यांच्या पत्नी मृणाली देसरकर हे पुण्यामध्ये राहतात. अजय देसकर आणि मृणाली यांच्या लग्नाला १० वर्ष झाली मात्र मुल होत नव्हते. सहा महिन्यांपूर्वी त्यांच्या घरी पाळणा हालला. सहा महिन्यांनी घरी बाळाचे आगमन झाल्याने कुटुंबात आनंदाचे वातावरण होते. या बाळाच्या बारशाचा कार्यक्रमही अमरावतीमध्ये अगदी थाटामाटात पार पडला. पण देसरकर कुटुंबाच्या या आनंदाला, सुखाला नियतीची नजर लागली अन् भयंकर घडलं.



अमरावतीमध्ये बारशाचा कार्यक्रम झाल्यानंतर अजय देसरकर, मृणाली देसरकर पुण्याला जाण्यासाठी निघाले. घरी चिमुकल्याची काळजी घेण्यासाठी मृणाली देसरकर यांच्या आई आशालता पोपळघट यांनाही येण्याची विनंती केली. आपल्या क्विड कारने ६ जण पुण्याकडे जाण्यासाठी निघाले. यावेळी छत्रपती संभाजीनगरजवळील लिंबेजळगाव परिसरात त्यांच्या कारला भरधाव स्कॉर्पिओने जोराची धडक दिली. या धडकेत मृणाली देसरकर, सहा महिन्यांचे बाळ आणि आजी आशालता पोपळघर आणि दुर्गा सागर गिते यांचा जागीच मृत्यू झाला. या दुर्घटनेत अजय देसरकर आणि शुभांगिनी गीते हे दोघेही गंभीर जखमी झालेत. धक्कादायक बाब म्हणजे भरधाव वेगात असलेल्या गाडीमधील तरुण हे मद्यधुंद अवस्थेत होते तसेच त्यांच्याकडे गाडी चालवण्याचा परवाना नसल्याचेही समोर आले आहे. या प्रकरणी दोन्ही तरुणांना अटक करण्यात आली आहे. विशाल उर्फ उद्धव ज्ञानेश्वर चव्हाण आणि कृष्णा कारभारी केरे अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. मद्यधुंद तरुणांच्या या मस्तीने एक हसत खेळत कुटुंब उध्वस्त झालं. ज्या घरात दोन दिवसांपूर्वी आनंद, उत्साहाचे वातावरण होते. १० वर्षांनंतर झालेल्या चिमुकल्याचे लाड केले जात होते. त्या कुटुंबावर काळाने घाला घातला अन् क्षणात होत्याचं नव्हतं झालं. या मन सुन्न करणाऱ्या घटनेने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. दरम्यान, पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

## मंत्री उपस्थित नसतानाही त्यांच्या नावे शासकीय विश्रामगृहाचे बुकींग

### अंबादास दानवेंनी व्यक्त केला संताप



प्रतिनिधी
■ पुणे

महाराष्ट्रातील विधानसभा निवडणूक तोंडावर येऊन ठेपली आहे. यामुळे सध्या विरोधक आणि सत्ताधाऱ्यांमध्ये आरोप प्रत्यारोपाच्या फैरी उडताना दिसत आहे. त्यातच आता महाराष्ट्राचे विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी एक धक्कादायक बाब उघडकीस आणली आहे. अंबादास दानवे हे दोन दिवसांपूर्वी पुण्यातील शासकीय विश्रामगृहात गेले होते. त्यावेळी या शासकीय विश्रामगृहातील काही सूट मंत्री आणि त्यांच्या पीएच्या नावाने बुक असल्याचा दावा अंबादास दानवे यांनी केला आहे. यावरुन अंबादास दानवेंनी संबंधित कर्मचाऱ्यांना याप्रकरणी जाबही विचारला आहे.

राज्याचे विधानपरिषद विरोधी पक्षनेते अंबादास दानवे हे दोन दिवसांपूर्वी बीड, संभाजीनगर आणि धाराशिव दौऱ्यासाठी गेले होते. हा दौरा संपल्यानंतर अंबादास दानवे हे पुण्यातील शासकीय विश्रामगृहामध्ये गेले होते. या शासकीय विश्रामगृहात पोहोचल्यानंतर अंबादास दानवेंना काही सूट मंत्री आणि त्यांच्या पीएच्या नावाने कायमस्वरुप बुक केल्याचे निदर्शनास आले. विशेष म्हणजे कोणताही पीए किंवा संबंधित मंत्री त्या विश्रामगृहात उपस्थित नव्हता. पण तरीही त्यांच्या नावाने सूटचे बुकींग असल्याने अंबादास दानवेंनी संताप व्यक्त केला.

यानंतर अंबादास दानवेंनी उपस्थित असलेल्या कर्मचाऱ्याला चांगलेच धारेवर धरत त्याला याबद्दल जाब विचारला. मंत्र्याची शासकीय विश्रामगृहात बुकिंग नाही तरी सूटचे बुकींग का करुन ठेवले आहे? असा सवाल विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांनी उपस्थित केला. मी इकडे आलोय तर बाहेर सतरंजी टाकून झोपेन, ते मंत्री स्वतः इथे असते तर मला मान्य आहे? इथे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांना वेगळे सूट आहेत ना? मग अधिकाऱ्यांना प्रोटोकोल माहित आहे का नाही? असेही अंबादास दानवे म्हणाले. त्यावर तो कर्मचारी म्हणाला या ठिकाणी ते किंवा त्यांचे पीए राहतात. यानंतर अंबादास दानवे यांनी ते इथे असतील तर ना? आता ते इथे आहेत का? ते इथे नसताना तुम्ही तो सूट कोणाला देता का? त्यावर त्या कर्मचाऱ्याने नकारार्थी मान डोलवत नाही म्हटले. त्यावर अंबादास दानवेंनी मग स्फूटणीमध्ये एक नंबरचा सूट बंद का आहे? मंत्र्याच्या अनुपस्थितीमध्ये एक नंबरचा सूट तुम्ही कोणाला देता? तो सूट काय त्यांच्या घरचा आहे का? तुम्ही त्यांना का देता? तुम्हाला तशी ऑर्डर आहे का? कोण आहे इंजिनियर? असे अनेक प्रश्नही त्याला विचारले.

## पुण्यात पुन्हा गोळीबार, उरूळी कांचनमधील इनामदार वस्तीजवळ थरार

प्रतिनिधी
■ पुणे

पुण्यातील उरूळी कांचनमध्ये इनामदार वस्तीजवळ येथे गोळीबाराची घटना घडली आहे. बापू शितोळे याने तीन ते चार जणांवर गोळीबार केल्याची माहिती समजत आहे. या गोळीबारामध्ये काळुराम गोते हे गंभीर जखमी झालेत. त्यांना उपचारासाठी खासगी रूग्णालयामध्ये दाखल करण्यात आलं आहे. या गोळीबाराचे कारण अद्याप समजू शकलेले नाही. पोलीस घटनास्थळी पोहोचले असून पंचनामा करण्याचं काम सुरू आहे. या घटनेमुळे पुणे शहरात कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होताना दिसत आहे.

विद्येचे माहेरघर आणि सांस्कृतिक राजधानी असलेली पुण्याची ओळख आता संपत चालली आहे. देशासह जगभरातून पुण्यामध्ये शिक्षण घेण्यासाठी विद्यार्थी येत असतात. मात्र आता दिवसाढवळ्या अशा गोळीबाराच्या घटना घडत आहेत. त्यामुळे नागरिकांना जीव मुठीत ठेवूनच आता फिरावं लागत आहे. कोण कधी कुठे कोणावरही गोळीबार किंवा कोयत्याने हल्ला करेल काही सांगता येत नाही. आता मागे पुण्याचे माजी नगरसेवक वनराज आंदेकर यांची घराजवळ निर्घृणपणे हत्या करण्यात आली होती. घरातील संपत्तीच्या वादातून त्यांच्या बहिणीच्या पतीने सुपारी देत हत्या केली.पुण्यातील नाना पेठमधील डोके तालीमजवळ रात्री नऊच्या सुमारास आपल्या भावासोबत उभे असलेल्या वनराज आंदेकर यांच्यावर 10-12 हल्लेखोरांनी त्यांच्यावर जीवघेणा हल्ला केला. सुरूवातील गोळीबार केला आणि त्यानंतर कोयत्याने हल्ल करत जागेवरच त्यांना संपवलं. या घटनेला एक महिनाही झाला नाहीतकर उरूळी कांचन येथे गोळीबार झाल्याची घटना समोर आली आहे. पुण्यातील गुडांना पोलिसांचा धाक राहिला आहे की नाही? असा सवाल आता उपस्थित केला जात आहे. गणेशोत्सव सुरू असताना अशा प्रकारच्या घटना घडत आहेत. त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झालं आहे.

## सहा वर्षीय मुलीवर अत्याचार करत मृतदेह फेकला केळीच्या बागेत

प्रतिनिधी
■ नंदूरबार

राज्यात लहान मुलींवरील अत्याचाराच्या घटना सुरुच आहे. बदलापूरनंतर नंदूरबारमध्ये अल्पवयीन मुलीवर अत्याचार करून तिची हत्या केल्याची खळबळजनक घटना समोर आली आहे. नंदूरबारच्या तळोदा तालुक्यातील खरवडमध्ये ही संतापजनक घटना घडली आहे. नंदूरबारमधील या घटनेने राज्यात सर्वत्र खळबळ उडाली आहे. या घटनेनंतर नंदूरबार पोलिसांनी २४ तासांत आरोपीला अटक केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, नंदूरबारच्या तळोदा तालुक्यातील खरवड येथे खळबळजनक घटना घडली आहे. जिल्हा परिषदेची



शाळा शिकणाऱ्या सहा वर्षीय मुलीचं अपहरण करून हत्या झाल्याची संतापजनक घटना घडली आहे. अत्याचार आणि हत्येच्या घटनेनंतर पोलीस विभागाने तातडीने या गुन्ह्याची दखल घेत आरोपीला २४ तासांच्या बेड्या ठोकल्या आहेत.

खरवड येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत शिकणारी ६ वर्षीय मुलगी १२ तारखेला शाळेतून घरी परतली नाही. बराच वेळ झाल्यानंतरही मुलगी घरी परतली नसल्याने तिच्या कुटुंबीयांनी पोलिसांत धाव घेतली. त्यानंतर तिच्या कुटुंबीयांनी पोलिसांत मुलगी हरवल्याची तक्रार नोंदवली. पोलिसांत तक्रार नोंदवल्यानंतर पोलिसांनी पुढील शोध सुरु केला. पोलिसांच्या तपासात मुलगी एका नातेवाईकांसोबत दुचाकीवर बसून गेल्याची नोंद सीसीटीव्हीत दिसून आली. त्यानंतर पुढील तपासात मुलीचा मृतदेह एका केळीच्या बागेत सापडला. त्यानंतर पोलिसांनी तातडीने आरोपीचा शोध घेत त्याच्या मुसक्या आवळल्या. या प्रकरणाचा शोध पोलिसांनी सुरु केला आहे.

## भाजपचे संकटमोचक संकटात सापडले!

### ग्रामस्थांचा रोष अन् गिरीश महाजनांनी काढला पळ

प्रतिनिधी
■ जळगाव

राज्याचे ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन हे भारतीय जनता पक्षाचे बडे नेते आणि संकटमोचक म्हणून ओखळले जातात. राजकीय पेच, आंदोलने, नाराजीनाट्य असो किंवा विरोधकांची कोंडी करायची असो गिरीश महाजन आपल्या चातुर्याने सर्वांवर मात करतात. म्हणूनच भारतीय जनता पक्षाचे संकटमोचक अशी त्यांची खास ओळख आहे. मात्र सध्या सोशल मीडियावर एक व्हिडिओ चांगलाच व्हायरल होत आहे. ज्यामध्ये संकटमोचक गिरीश महाजन यांना नागरिकांच्या रोषाला सामोरे जावे लागले अन् थेट दुचाकीवर बसून पळ काढावा लागला.



याबाबत सविस्तर माहिती अशी की, भाजप नेते गिरीश महाजन हे जळगावमधील जामनेर मतदारसंघाचे नेतृत्व करतात. दोन दिवसांपूर्वी ते जामनेर तालुक्यातील लिहा तांडा येथे कार्यक्रमासाठी गेले होते. यावेळी या गावातील रस्त्यांची स्थिती फारच वाईट असल्याचे निदर्शनास आले. यावरुनच गिरीश महाजन यांना स्थानिक तरुणांनी जाब विचारला. तरुणांचा हा आक्रमकपणा पाहून गिरीश महाजन यांनी कोणतेही उत्तर न देता दुचाकीवर बसून त्या ठिकाणाहून काढता पाय घेतला, ज्याचा व्हिडिओ सध्या माध्यमांवर व्हायरल होत आहे.

या व्हिडिओमध्ये तुम्ही पाहू शकता की, ग्रामविकास मंत्र्यांच्या जामनेर मतदार संघामधील रस्त्यांची फारच वाईट स्थिती दिसून येत आहेत. याच खराब रस्त्यांबाबत गावातील तरुण त्यांना जाब विचारतांना दिसत आहेत. मात्र, गिरीश महाजन त्यांना उत्तर न देता दुचाकीवर बसून याच चिखल असलेल्या खराब रस्त्यातून वाट काढत निघून जातात. गिरीश महाजन यांच्या या कृतीवरुन स्थानिकांनी नाराजी व्यक्त केली आहे.

## ज्योती मेटे बीडमधून लढण्यावर ठाम

■ बीड



आगामी विधानसभा निवडणुकीच्या माध्यमातून सर्वच राजकीय पक्षांनी आपापली तयारी सुरू केली आहे. शिवसंग्राम पक्षाच्या नेत्यांनी देखील उमेदवार उभे करणार असल्याची घोषणा केली होती. मात्र, आता त्यांची चर्चा शरद पवार आणि अजित पवार या दोन्ही नेत्यांसोबत सोबत सुरू आहे, अशी माहिती त्यांनी स्वतः दिली. ज्योती मेटे या बीडमधून निवडणूक लढण्यासाठी इच्छुक आहेत. या आधी देखील त्यांनी बीड लोकसभा मतदारसंघातून निवडणुकीसाठी तयारी केली होती. त्यामुळे आता या वेळी त्या काय निर्णय घेतात? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. विनायकराव मेटे यांच्या निधनानंतर शिवसंग्राम पक्ष कोणत्यातरी पक्षात विलीन होईल, अशी शक्यता वर्तवली जात होती. मात्र, शिवसंग्राम पक्ष कोणत्याही परिस्थितीत विलीन होणार नसल्याचे ज्योती मेटे यांनी स्पष्ट केले आहे. आगामी काळात होणाऱ्या निवडणुका लढवण्यावर आमचा भर असेल, असे देखील ज्योती मेटे यांनी सांगितले आहे. विधानसभा निवडणुकीत शिवसंग्राम पक्ष किमान पाच जागा लढवणार असल्याचे ज्योती मेटे यांनी माध्यमंशी बोलताना सांगितले होते. मात्र, आता महायुती आणि आघाडी सोबत त्यांची चर्चा सुरू आहे. मुंबई, कोकण, विदर्भ, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्र या पाच विभागात पाच जागा लढण्याची तयारी शिवसंग्राम पक्षाच्या माध्यमातून केली जात आहे.

## पुण्यातील महिला पोलिसावर निलंबनाची कारवाई, कोल्हापुरात तक्रार दाखल

■ पुणे

मित्राच्या पत्नीला परपुरुषासोबत शारिरीक संबंध ठेवण्याचा आग्रह धरणाऱ्या पुण्यातील एका महिला पोलिसावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. ही पोलिस शहर वाहतूक पोलिस विभागात कार्यरत होती.

अनघा ढवळे असे आरोपी महिला पोलिसाचे नाव आहे. इन्स्टास्टार म्हणूनही ती ओळखली जाते. पीडित महिलेने याविषयी कोल्हापूरच्या गडहिंग्लज पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. या तक्रारीनुसार तिच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली. पोलिसांच्या माहितीनुसार, कोथरुडच्य वाहतूक पोलिस विभागात नेमणूक असताना अनघा ढवळे हिने आपल्या मित्राच्या पत्नीवर परपुरुषाशी संबंध ठेवण्यासाठी दबाव टाकला होता. यासाठी तिने तिच्या कुटुंबातील लोकांना ठार मारण्याचीही धमकी दिली होती.




मी पुण्याची स्थानिक आहे. माझी वेगवेगळ्या गुंडांबरोबर ओळख आहे. आम्ही एक सामाजिक संस्थाही चालवतो. ब्लॅक मनीचे लीगलमध्ये रुपांतर करतो. आमचे आतापर्यंत 9 कोटींचे व्यवहार झाले असून, तुझ्या नवऱ्यालाही 40 ते 50 लाख रुपये मिळतील, असेही आरोपी महिला पोलिस कर्मचाऱ्याने आपल्याला सांगितल्याचे पीडित महिलेने आपल्या तक्रारीत नमूद केले आहे.

अनघा ढवळे हिच्या या धमक्यांना कंटाळून पीडित महिलेने कोल्हापूर जिल्ह्यातील गडहिंग्लज पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानंतर आज आरोपी महिला पोलिसावर निलंबनाचीही कारवाई करण्यात आली.

## राजीव पटेल आणि दीपस्तंभ फाऊंडेशनला 'मृत्युंजय'चे पुरस्कार

प्रतिनिधी
■ पुणे

'मृत्युंजय'कार शिवाजीराव सावंत यांच्या स्मरणार्थ कार्यरत असलेल्या मृत्युंजय प्रतिष्ठानमार्फत यंदाचा साहित्यविषयक पुरस्कार राजीव पटेल यांना, तर समाजकार्य पुरस्कार जळगाव येथील दीपस्तंभ फाऊंडेशन या संस्थेस देण्यात येणार आहे. प्रतिष्ठानचे संस्थापक-कार्यकारी विश्वस्त डॉ. सागर देशपांडे यांनी ही माहिती दिली.

वयाच्या 53 व्या वर्षी लेखनास सुरुवात केलेल्या राजीव पटेल यांनी वैदिक, भीष्म, याज्ञवलक्य, पराशर ऋषी, चंद्रवंश, आद्य शंकराचार्य आणि काही संत महात्म्यांवरील साहित्यकृती वाचकांना सादर केल्या आहेत. यापैकी काहींचे गुजरातीमध्ये भाषांतर झाले आहे. त्यांना साहित्य विषयक पुरस्कारही मिळाले आहेत. तर खानदेशात स्पर्धा परीक्षा केंद्राची प्रथमच सुरुवात करणाऱ्या यजुर्वेंद्र महाजन यांनी दीपस्तंभ फाऊंडेशनमार्फत दिव्यांग, अनाथ, गरीब मुलामुलींच्या उच्च शिक्षणाची आणि निवासाची मोफत सोय केली असून त्यांना स्वावलंबी बनवण्यासाठी योगदान दिले आहे. आजपर्यंत अशा 2000 मुलामुलींचे पालकत्व दीपस्तंभने स्वीकारले असून त्यातील 300 हून अधिक दिव्यांग युवक-युवतींनी भारतीय



राजीव पटेल



यजुर्वेंद्र महाजन

आणि महाराष्ट्र पातळीवरील महत्त्वाच्या स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळवून अधिकारपदाची जबाबदारी स्वीकारली आहे. अलिकडेच जळगावमध्ये महाजन यांनी निवासी स्वरुपाचा 'मनोबल' हा देशातील अत्यंत नाविन्यपूर्ण असा प्रकल्प दिव्यांगांसाठी उभारला आहे.

पुरस्कारांचे हे 18 वे वर्ष असून सावंत यांच्या 22 व्या स्मृतीदिनी 19 सप्टेंबरला हे पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. एस. एम. जोशी फाऊंडेशनच्या सभागृहात संध्याकाळी 6 वाजता होणाऱ्या कार्यक्रमात ज्येष्ठ साहित्यिक विजय कुवळेकर यांच्या हस्ते हे पुरस्कार देण्यात येतील, असे डॉ. देशपांडे यांनी सांगितले. रोख रक्कम, सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरुप आहे. मृत्युंजय प्रतिष्ठानमार्फत आजपर्यंत डॉ. आनंद यादव, जगदीश खेबुडकर, डॉ. यु. म. पठाण, ना. धों महानोर, बाबा कदम, भा. द. खेर, वीणा गवाणकर, उत्तम बंडू तुपे, प्रवीण दवणे, डॉ. द. ता. भोसले, ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर, डॉ. रवींद्र शोभणे, अ. भा. मराठी साहित्य संमेलनाच्या माजी अध्यक्षा डॉ. अरुणा ढेरे, राजेंद्र खेर, अरविंद गोखले या साहित्यिकांना साहित्यविषयक पुरस्कार देण्यात आले आहेत असे सांगून डॉ. देशपांडे म्हणाले की, समाजकार्यविषयक पुरस्कार लोकसाधना प्रकल्प, चिखलगाव-दापोली, डॉ. जे. पी. नाईक महाविद्यालय उत्तूर - आजरा, जीवरक्षक दिनकर कांबळे - कोल्हापूर, बाळासाहेब कोळेकर - कोयनानगर, स्वातंत्र्यसैनिक हरिभाऊ लिमये - पुणे, सुरेश हुंदरे - बेळगाव, कांचनताई परुळेकर - कोल्हापूर, डॉ. भीमराव गस्ती - बेळगाव, गिरीश प्रभुणे - चिंचवड, अशोक रोकडे - व्हाईट आर्मी - कोल्हापूर, रेणू गावस्कर, पुणे, विद्याधर निमकर - चतुरंग प्रतिष्ठान, मुंबई यांना देण्यात आले आहेत. मराठवाड्यातील दुष्काळावेळी कार्यक्रम रद्द करून एक वर्ष ही सर्व रक्कम नाम फाऊंडेशनला देण्यात आली. तर कोल्हापुरातील महापुराच्या वेळी अनेक जणांचे प्राण वाचवलेल्या व्हाईट आर्मीचे आदम मुल्लाणी यांचे अपघाती निधन झाल्यावर मृत्युंजय प्रतिष्ठानने त्यांच्या कुटुंबियांना एक लाख रुपयांचे अर्थ साहाय्य दिल्याचेही डॉ. देशपांडे यांनी नमूद केले.

## गणेशोत्सवानिमित्त आयोजित केलेल्या भंडाऱ्यातून विषबाधा

### 113 विद्यार्थ्यांवर उपचार सुरु

प्रतिनिधी
■ जळगाव

जळगावाच्या पारोळा तालुक्यातील शिवरे दिगर येथे सारंग माध्यमिक विद्यालयात गणपती विसर्जनानिमित्त भंडाऱ्याचा कार्यक्रम ठेवण्यात आला होता. या भंडाऱ्यात शाळेतील सर्व विद्यार्थी विद्यार्थिनींनी जेवण केले. मात्र या जेवणातून तब्बल 113 विद्यार्थ्यांना विषबाधा झाली आहे. या विद्यार्थ्यांना तामसवाडी प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले आहेत. सध्या त्यांच्यावर उपचार सुरु आहेत. या घटनेनंतर आमदार चिमणराव पाटील, माजी मंत्री डॉ. सतीश पाटील, डॉ. हर्षल माने, डॉ. संभाजी पाटील यांनी विद्यार्थ्यांची भेट घेतली.

जळगावातील सारंग माध्यमिक विद्यालयात गणपती विसर्जनानिमित्त आयोजित केलेल्या भंडाऱ्यातून अनेक विद्यार्थ्यांना विषबाधा झाली आहे. या भंडाऱ्यात वरण-भात, गुलाब जामुन, भाजी असे जेवण होते. यावेळी शिक्षक आणि विद्यार्थी मिळून हे जेवण जेवले. हे जेवण जेवल्यानंतर काही विद्यार्थी-विद्यार्थिनींना उलट्या, चक्कर, मळमळ होणे, हातपाय गळणे






इत्यादी त्रास होऊ लागला. यानंतर त्यांना तामसवाडी येथून पारोळा या ठिकाणी उपचारासाठी पाठवण्यात आले. साधारण 5 वाजल्यापासून रात्री 9 वाजेपर्यंत या विद्यार्थ्यांवर उपचार सुरू होते. त्यानंतर केलेल्या तपासणीदरम्यान विद्यार्थ्यांना अन्नातून विषबाधा झाल्याची माहिती समोर आली.

भंडाऱ्यात जेवणानंतरच विद्यार्थ्यांना विषबाधा झाल्याची माहिती समोर येताच जळगावातील नागरिकांना धक्का बसला आहे. विषबाधा झालेल्या 12 ते 15 वयोगटातील एकूण 70 विद्यार्थी व चार शिक्षकांचाही समावेश आहे. सध्या पारोळा कुटीर रुग्णालयात या सर्व विद्यार्थ्यांवर उपचार सुरू आहेत. तर दोन विद्यार्थिनींना उपचारासाठी धुळ्यात हलविण्यात आले आहे. या घटनेनंतर विद्यार्थ्यांच्या पालकांनी रुग्णालयात एकच गर्दी केली आहे. सध्या शहरातील अनेक डॉक्टर उपचारासाठी दाखल झाले होते. या घटनेमुळे अनेक नागरिक हे चिंताग्रस्त असल्याचे पाहायला मिळत आहे.

या घटनेनंतर आमदार चिमणराव पाटील, माजी मंत्री डॉ. सतीश पाटील, डॉ. हर्षल माने, डॉ. संभाजी पाटील यांनीही रुग्णालयात धाव घेत विद्यार्थ्यांची विचारपूस केली. तसेच यावेळी आमदार चिमणराव पाटील यांनी जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांच्याशी भ्रमणध्वनीद्वारे संपर्क साधला. त्यावेळी त्यांनी कुटीर रुग्णालयात डॉक्टरांची तसेच स्टॉप, वार्डची वाढ करावी, अशीही मागणी केली.

## राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी घेतले गणरायांचे दर्शन

**मुंबई:** राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी आज मुंबईतील मानाच्या गणपतींचे दर्शन घेऊन मनोभावे प्रार्थना केली. मुंबईतील लालबागचा राजा, मुंबई सेंट्रल येथील हमाल मंडळाचा गणपती तसेच गिरगावच्या केशवजी नाईक चाळ येथील मुंबईतील पहिल्या श्री सार्वजनिक गणेशोत्सव संस्थेच्या गणपतीस भेट देऊन राज्यपालांनी दर्शन घेतले. हमाल मंडळाच्या गणपतीची आरती करून राज्यपाल श्री. राधाकृष्णन यांनी तेथील गणेश भक्तांशी संवाद साधला. केशवजी नाईक चाळ येथील गणेशोत्सवाची परंपरा त्यांनी जाणून घेतली.



# भारताच्या विकासात पारशी समुदायाचे योगदान मोठे – केंद्रीय अल्पसंख्याक कार्य मंत्री किरेन रिजिजू

प्रतिनिधी
■ मुंबई

भारताच्या विकासात पारशी समुदायाचे योगदान मोठे आहे. जिओ पारशी योजनेच्या माध्यमातून या समाजाचा सांस्कृतिक वारसा, शिक्षण, लोकसंख्या वाढ आणि रोजगाराच्या संधी यावर भर दिला जाणार आहे. त्यासाठी जिओ पारशी योजनेची माहिती व प्रसारासाठी अशा कार्यशाळा आयोजित केल्या जात असल्याचे प्रतिपादन केंद्रीय अल्पसंख्याक कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनी केले.

केंद्र शासनाच्या अल्पसंख्याक कार्य मंत्रालयाद्वारे यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे जिओ पारशी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी केंद्रीय अल्पसंख्याक कार्यमंत्री किरेन रिजिजू बोलत होते.यावेळी राज्याचे अल्पसंख्याक विकास मंत्री अब्दुल सत्तार, केंद्रीय अल्पसंख्याक कार्य राज्यमंत्री जॉर्ज कुरीयन, केंद्रीय अल्पसंख्याक कार्य मंत्रालयाच्या उपमहानिदेशक ऋचा शंकर, अल्पसंख्याक विकास विभागांच्या प्रधान सचिव रिचा बागला, पारशी मुख्य धर्मोपदेशक उदवाडाचे श्री. दस्तूरजी आणि राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष इकबाल सिंह लालपुरा, उपाध्यक्ष केरसी के. देबू, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष प्यारे जिया खान तसेच पारशी समाज बांधव उपस्थित होते.

जिओ पारशी कार्यशाळा




यावेळी केंद्रीय अल्पसंख्याक मंत्री किरेन रिजिजू म्हणाले, पारशी समाजाच्या सामाजिक समस्यांवर चर्चा करणे आणि त्यावर उपाययोजना करण्यासाठी जिओ पारशी कार्यशाळा उपयोगी ठरणार आहे. या कार्यशाळेच्या माध्यमातून केंद्र सरकार वैद्यकीय सहाय्य, प्रजनन समस्या असलेल्या जोडप्यांचे समुपदेशन, समुदायाचे आरोग्य आदी उपाययोजनांवर भर देत आहे. जिओ पारशी योजनेच्या प्रचारासाठी कार्यशाळा, शिबिरे आणि प्रिंट तसेच सोशल मीडियाद्वारे प्रयत्न करण्यात येत आहेत.

यावेळी राज्याचे अल्पसंख्याक विकास मंत्री अब्दुल सत्तार म्हणाले, "पारशी समुदायाच्या विकासासाठी केंद्र सरकारचा एक महत्त्वपूर्ण उपक्रम जिओ पारसी योजना आहे. ही योजना राज्यात यशस्वी होण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. जिओ पारसी योजनेचे उद्दिष्ट आर्थिक सहाय्य, शैक्षणिक सहाय्य करणे. पारशी समाजाचा समृद्ध सांस्कृतिक वारसा जतन करणे हे आहे. पारशी समुदायाने पुढे येऊन या योजनेचा लाभ घ्यावा. राज्य सरकार अल्पसंख्याक समुदायाच्या विकासासाठी वचनबध्द असून या योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे.

# श्रीकांत चषक कॅरम स्पर्धेत गिरीश, अद्वैत, भव्याची विजयी सलामी

प्रतिनिधी
■ मुंबई

श्रीकांत स्पोर्ट्स क्लब-कांदिवली व आयडियल स्पोर्ट्स अकॅडमी आयोजित श्रीकांत चषक आंतर शालेय-कॉलेज कॅरम स्पर्धेत गिरीश पवार, अद्वैत पालांडे,भव्या सोळंकी, अवैस खान, गौरांग मांजरेकर आदींनी सलामीचे सामने जिंकले. गिरीश पवारने सरळ जाणाऱ्या सोंगट्याचे सातत्य राखत शंभू धुरीचे आव्हान १६-० असे सहज संपुष्टात आणले. स्पर्धेचे उद्घाटन उद्योजक शैलेश दलाल, भरत नवघरे, जयंती परमार, राशीद सिद्दीकी, शिवछत्रपती पुरस्कार विजेते लीलाधर चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. स्पर्धेमध्ये मुंबई शहर व उपनगर, ठाणे, पालघर, रायगड, कोल्हापूर आदी जिल्ह्यातील ज्युनियर ४८ खेळाडूंमध्ये कांदिवली-पूर्व येथील कानकश्री सभागृहात चुरशीच्या लढती होत आहेत.



अवैस खान वि. अनय म्हेत्रे यामधील लढत अटीतटीची होऊन ४-४ अशा बरोबरीनंतर अवैस खानने ५-४ अशी बाजी मारली. अमेय जंगमने ४-० असा दमदार प्रारंभ करूनही निर्णायक क्षणी अचूक फटके साधत अद्वैत पालांडेने १४-४ अशी बाजी मारली. भव्या सोळंकीने कौस्तुभ जागुष्टेचा १४-० असा, गौरांग मांजरेकरने झहीर खानचा २५-० असा, कोल्हापूरच्या ओमकार वडारने कुरेशी मोहमदचा १९-० असा, अर्णव गावडेने सुरज लांबोरेचा १७-० असा, समीर खानने दुर्वेश पराडकरचा २५-० असा, सार्थक केरकरने अब्दुल तन्वीरचा २५-५ असा तर वेदांत राणेने मानस नगरकरचा १७-० असा पराभव करून दुसऱ्या फेरीत प्रवेश केला.

# थकलेल्या गणेशभक्तांसाठी पॅरागॉनचा सुखाचा विसावा

प्रतिनिधी
■ मुंबई

गणेश दर्शनासाठी तासनतास रांगेत उभे राहून थकलेल्या गणेश भक्तांच्या पायांना थोडा आराम मिळावा... पुढच्या दर्शनासाठी पायात बळ यावे म्हणून पॅरागॉनने मुंबईतील अनेक प्रतिष्ठित-नामांकित आणि भक्तांची विघ्नहर्त्या गणेश मंडळांच्या आवारातच सुखाचा विसावा उभारला आहे. यात गणेशभक्तांच्या पायांना मोफत फुटमसाज करण्याची सोय केली आहे.




महाराष्ट्रातच नव्हे तर अवघ्या जगभरात मुंबईच्या गणेशोत्सवाची आतुरतेने वाट पाहिली जाते. त्यामुळे मुंबईतील शेकडो गणेशोत्सव मंडळे गणेशभक्तांच्या नजरेसमोर असतात. मुंबईबाहेरील असो किंवा मुंबईतील असो साऱ्याच गणेशभक्तांचे विशेष आकर्षण लालबाग, परळ, गिरगाव, खेतवाडी, चेंबूर येथील गणेशोत्सव मंडळे असतात. मग ती गणेशाची भव्य मूर्ती असो किंवा ऐतिहासिक देखावे. हे याचि देही याचि डोळा पाहण्यासाठी दररोज लाखोच्या संख्येने भाविक येताहेत. सर्वच ठिकाणी प्रचंड गर्दी असल्यामुळे भाविकांना तीन-चार तास रांगेत उभे राहावे लागतेय. अशा स्थितीत थकलेल्या भक्तांच्या पायाला थोडासा आराम मिळावा म्हणून चपलांसाठी प्रसिद्ध असलेल्या पॅरागॉनने लालबागमधील मुंबईचा राजा (गणेशगल्ली), परळचे लाल मैदान, खेतवाडीतील खेतवाडीचा राजा, फोर्टचा चिंतामणी, चेंबूरचे सह्याद्री क्रीडा मंडळ येथे सुखाचा विसावा म्हणून फुट मसाजच्या मशीन लावल्या आहेत. दररोज हजारोंच्या संख्येने भाविक या विनामूल्य सेवेचा आवर्जून लाभ घेत आहेत. फूटमसाजनंतर भक्तांचा दूर होणारा थकवा पाहून पॅरागॉनने ही सेवा मुंबईतील जास्तीत जास्त गणेशोत्सव मंडळांमध्ये सुरू करण्याचा मानस पॅरागॉनने व्यक्त केला.

# संविधानाचा अपमान करणाऱ्याचा निषेध केलाच पाहिजे - आमदार मंगेश कुडाळकर

प्रतिनिधी
■ मुंबई

परदेशात आरक्षण रद्द करण्यासंदर्भात राहुल गांधी यांनी केलेले वक्तव्य निषेध करणारे असून असा संविधानाचा अपमान करणे कायमच गैर आहे आणि त्याचा निषेध झालाच पाहिजे असे कुर्ल्यातील शिवसेना आमदार मंगेश कुडाळकर यांनी राहुल गांधी यांचा निषेध व्यक्त करताना सांगितले. परदेशात एका मुलाखतीमध्ये काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी आरक्षणाच्या विषयी केलेले वक्तव्य चांगलेच तापले असून देशभरात त्याचा निषेध केला जात आहे. राहुल गांधी यांच्या विरोधात शिवसेना शिंदे गटाकडून मुंबईत सर्वत्र निर्दर्शने करण्यात आली. कुर्ला नेहरू नगर येथील शिवसेना आमदार मंगेश कुडाळकर यांच्या माध्यमातून टिळक नगर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे राहुल गांधी यांनी भारताबद्दलचे गैर वक्तव्य आणि संविधानाचा अपमान केल्याच्या निषेधार्थ शिवसेनेतर्फे राहुल गांधी ह्यांच्या विरोधात निर्दर्शने करण्यात आली. यावेळी आमदार मंगेश कुडाळकर यांच्यासह शिवसेना पदाधिकारी आणि मोठ्या संख्येने स्थानिक नागरिक आंदोलन करण्यासाठी आले होते,

शिवसैनिकांकडून राहुल गांधींच्या वक्तव्याविरोधात कुर्ल्यात निर्दर्शने




# आरक्षण संपवण्याची भाषा करणाऱ्या राहुल गांधींच्या निषेधार्थ रिपब्लिकन पक्ष देशभर आंदोलन तीव्र करणार

प्रतिनिधी
■ मुंबई

अमेरिकेत जाऊन काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी भारतातील आरक्षण संपवण्याबाबत केलेल्या वक्तव्याचा आम्ही तीव्र निषेध करतो. राहुल गांधी यांचे आरक्षण विरोधी वक्तव्य हे संविधानाचा अवमान करणारे आहे. राहूल गांधींचे आरक्षण विरोधी वक्तव्य संविधानकार महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांचा अवमान करणारे आहे. त्यामुळे राज्यात आणि संपूर्ण देशभरात रिपब्लिकन पक्ष राहुल गांधींचा तीव्र निषेध करीत आहे.देशभरात रिपब्लिकन कार्यकर्ते राहुल गांधींचा तीव्र धिक्कार करून आपल्या भावना व्यक्त करतील. रिपब्लिकन पक्ष देशभर राहुल गांधींच्या निषेधार्थ तीव्र आंदोलन छेडत असल्याची घोषणा आज रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्य मंत्री ना. रामदास आठवले यांनी केली. आज मुंबई मराठी पत्रकार संघात झालेल्या पत्रकार परिषदेत ना.रामदास आठवले बोलत होते. यावेळी रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस अविनाश महातेकर राज्य सरचिटणीस गौतम सोनवणे मुंबई अध्यक्ष सिद्धार्थ कासारे; एम एस नंदा; उपाध्यक्ष सोहेल शेख जिल्हा अध्यक्ष संजय पवार; युवक आघाडी मुंबई अध्यक्ष साचीनभाई मोहिते आदी अनेक मान्यवर उपस्थित होते.



महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी दलित आदिवासी ओबीसी मागासवर्गीयांना संविधानाद्वारे दिलेले आरक्षण कोणीही संपवू शकत नाही. जो पर्यंत सूर्य चंद्र आहे तो पर्यंत भारताचे संविधान राहील आणि संविधानाने दिलेले आरक्षण राहील. आरक्षण संपविण्याचे बेताल वक्तव्य करणाऱ्या राहुल गांधींचा आम्ही तीव्र निषेध करतो. खबरदार आरक्षण संपविण्याची भाषा कराल तर असा इशारा रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्य मंत्री ना रामदास आठवले यांनी दिला आहे. रिपब्लिकन पक्षाच्या वतीने राहुल गांधी यांच्या विरुद्ध राज्यभर आणि संपूर्ण देशात निषेध आंदोलन तीव्र करण्यात येईल .अशी घोषणा ना. रामदास आठवले यांनी केली.

आरक्षण विरोधी वक्तव्य केल्या प्रकरणी काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी माफी मागितली पाहिजे. तसेच काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी सुद्धा माफी मागितली पाहिजे.काँग्रेस च्या मित्रपक्षांनी राहुल गांधीना त्यांची चूक दाखवली पाहिजे त्यांच्या चुकीच्या वक्तव्यावर परदा टाकू नये अशी सूचना ना.रामदास आठवले यांनी केली.

सामाजिक दृष्ट्या भारतात सामंजस्य निर्माण झाल्यानंतर सामाजिक आरक्षण संपवण्याचा निर्णय काँग्रेस घेईल असे काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केलेले वक्तव्य निषेधार्ह आहे. या वक्तव्यातून राहुल गांधींनी काँग्रेस ही आरक्षण विरोधी असल्याचेच उघड केले आहे.काँग्रेस सर्वाधिक काळ देशात सत्तेत राहिली आहे.त्यांच्या काळात दलितांवर अधिक अत्याचार झाले आहेत .आज ही दलितांवर अत्याचार होतात.त्यामुळे दलित आदिवासी मागासवर्गीयांना संविधानाने दिलेले आरक्षण हे त्यांचे कवच कुंडल आहे. आरक्षण संपविण्याची भाषा करण्याची राहुल गांधीना गरज काय होती असा सवाल ना.रामदास आठवले यांनी केला आहे .

# जागतिक लिंफोमा दिनानिमित्त मार्गदर्शन

प्रतिनिधी
■ मुंबई

लिम्फोमा हा रक्ताच्या कर्करोगाचा सर्वात सामान्य प्रकार आहे आणि भारतात याचे प्रमाण सातत्याने वाढत चालले आहे. अशा वेळेस प्रगत उपचार पर्याय दिवसेंदिवस आवश्यक होत चालले आहेत. डिफ्यूज लार्ज बी-सेल लिम्फोमा (डी.एल.बी.सी.एल) हा नॉन-हॉजकिन लिम्फोमा (एन.एच.एल) चा सर्वात आक्रमक प्रकार आहे आणि देशात एकट्या डिफ्यूज लार्ज बी-सेल लिम्फोमामुळे दरवर्षी सुमारे 25,000 नवे रुग्ण सापडत आहेत.

विद्यमान उपचार असून सुद्धा, सुमारे 40% डी.एल.बी.सी.एल रूग्णांना हा रोग पुन्हा होतो किंवा रोग पुढे वाढत जातो, ज्यामुळे रुग्ण, त्यांचे कुटुंब आणि आरोग्य सेवा प्रणाली यांच्यासाठी महत्त्वपूर्ण आव्हाने निर्माण होतात. तथापि, भारतात आता सुमारे 20 वर्षांमध्ये डी.एल.बी.सी.एल च्या प्रथम श्रेणी उपचारांसाठी एफ.डी.ए ने मान्यता दिलेली पहिली थेरपी उपलब्ध आहे आणि म्हणून नवीन आशा निर्माण झालेली आहे. डी.एल.बी.सी.एल विरुद्धच्या लढाईत ही सफलता एक अतिशय महत्त्वपूर्ण टप्पा ठरली असल्याने रुग्णांना अत्याधुनिक काळजी व सुधारित परिणामांची क्षमता उपलब्ध होते. निदान व उपचार मार्गातील आव्हाने डी.एल.बी.सी.एल हा रक्ताच्या कर्करोगाचा एक अत्यंत उपचार करता येईल असा व संभाव्य पद्धतीने बरे करता येईल असा प्रकार असला, तरीसुद्धा मृत्यूदर चिंताजनक आहे, खास करून हे परत होणारा रोग (पुन्हा होणारा / बेडर (रिफ्रेक्टरी)) झालेल्या रूग्णांमध्ये पहायला मिळते. भारतात डी.एल.बी.सी.एल चे निदान झालेल्या सुमारे 30-40% लोकांना पाच वर्षे जगता येत नाही आणि हे जागतिक सरासरीपेक्षासुद्धा जास्त वाईट आहे चुकीचे निदान करणे आणि साधारण डॉक्टरांकडून संदर्भ देण्यास उशीर होणे, या उपचार मार्गातील महत्वपूर्ण समस्या आहेत आणि यांच्यामुळे उपचारांच्या सामर्थ्यात अनेकदा तडजोड होते. मागील दोन दशकांमध्ये, यापूर्वी उपचार न केलेल्या डी.एल.बी.सी.एल ने पीडित रूग्णांच्या परिणामांमध्ये सुधारणा करण्यात मर्यादित प्रगती केली गेली आहे. प्राथमिक उपचारांना अनेक रुग्णांकडून प्रतिसाद दिला जात आहे. पण तरीसुद्धा दहापैकी चार जण प्राथमिक उपचारांना प्रतिसाद देत नाहीत किंवा प्राथमिक उपचारानंतर दोन वर्षांच्या आत त्यांना रोग परत होतो. या रुग्णांना उपचारांचे मर्यादित पर्याय उपलब्ध असतात आणि ज्यामुळे ते आणि त्यांच्या कुटुंबातील सदस्य रोग परत होण्याच्या सतत भीतीत जगत असतात. म्हणून त्यांना भावनिक व मानसिक त्रास होत असतो. तब्बल 20 वर्षांनंतर महत्वपूर्ण शोध जवळपास दोन दशकांत पहिल्यांदाच, डी.एल.बी.सी.एल उपचारांमध्ये अभूतपूर्व प्रगती केली गेली आहे.

# 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' सुपरहिट - मुख्यमंत्री

पान १ वरुन...

सक्षम हे ब्रीद लक्षात घेऊन राज्य शासनाने ही योजना प्रभावीपणे राबविली. या योजनेतून लाडक्या बहिणींच्या खात्यावर रक्कम जमा झाली असून त्यामुळे त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद, त्यांच्याकडून मिळणारे प्रेम पाहिल्यानंतर मनाला समाधान मिळत आहे.लाडक्या बहिणींच्या चेहऱ्यावरील आनंद असाच कायम ठेवण्यासाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसह राज्य शासनाच्या इतरही योजना यापुढेही सुरु राहतील. लाडक्या बहिणींची साथ देणारा हा एकनाथ आहे असे सांगून या योजनांसाठी निधीची तरतूदही शासनाने केली असल्याचे मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले.तसेच भविष्यात या योजनेचा लाभ टप्प्या-टप्प्याने वाढविणार असल्याचे त्यांनी सांगितले.

शेतकरी कुटुंबातून आल्यामुळे मला गरिबीची जाणीव आहे. गरीब कुटुंबातील महिलांच्या दृष्टीने दीड हजार रुपयांचे मूल्य खूप मोठे आहे, हे अनेकांना माहित नाही. नुकतेच माझी भेट झाल्यानंतर प्रणाली बारड या बहिणीने मला सांगितले की, दीड हजार रुपयातून तिने घुंगरू कडीचा व्यवसाय सुरु केला. गौरी गणपतीच्या सणात तिला या व्यवसायातून दहा हजार रुपयांचे उत्पन्न मिळाले. याच प्रकारे इतरही भगिनींनी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेतून मिळालेले पैसे आपापल्या परीने विविध व्यवसायात गुंतविले आहे. त्यातून त्यांच्या व्यवसायाला आणि अर्थव्यवस्थेला चालना मिळत आहे. महिलांसाठी एसटी प्रवासात ५० टक्के सवलत दिल्यानंतर तोट्यातील एसटी महामंडळ नफ्यात आले. त्याचप्रमाणे आता मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेमुळेही राज्य शासनाच्या अर्थव्यवस्थेला नुकसान न होता चालना मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी व्यक्त केला.

मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजनेतून महिलांना एका वर्षात तीन घरगुती गॅस सिलेंडर मोफत देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यासोबतच मुलींना मोफत उच्च शिक्षण देण्याचा निर्णय घेवून त्यांच्या शिक्षणाला पाठबळ दिले आहे.मुलीच्या जन्मापासून ते १८ वर्षांपर्यंत तिच्या बँक खात्यात टप्प्या-टप्प्याने एक लाख रुपये जमा करण्यासाठी लेक लाडकी योजना सुरु केली आहे. लाडक्या बहिणींसोबत लाडक्या भावांसाठी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना सुरु करून त्यांना प्रशिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली आहे. या प्रशिक्षणार्थींना राज्य शासन दरमहा सहा ते दहा हजार रुपये विद्यावेतन देणार आहे.अशी योजना राबविणारे महाराष्ट्र हे पहिलेच राज्य असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.

# काश्मीर तीन कुटुंबांनी उद्ध्वस्त केले

पान १ वरुन...

या तिन्ही कुटुंबांनी मिळून तुमच्याशी जे केले ते पापापेक्षा कमी नाही. अनेक दशकांपासून जम्मू-काश्मीरच्या बरबादीला तिन्ही कुटुंबे जबाबदार आहेत. या तीन कुटुंबांनी येथे भ्रष्टाचाराला खतपाणी घातले. जमीन हडप करणाऱ्या टोळ्यांना प्रोत्साहन दिले. तुम्हाला छोट्या सुविधांसाठी तळमळ करायला लावली होती. या तिन्ही कुटुंबातील लोकांनाच सरकारी नोकऱ्यांमध्ये भरती करण्यात आले. मोदी म्हणाले, जुन्या सरकारमध्ये गृहमंत्री लाल चौकात जायलाही घाबरत होते पंतप्रधान म्हणाले, जम्मू-काश्मीरमधील तीन कुटुंबांनी येथे फुटीरतावाद आणि दहशतवादासाठी मैदान तयार केले. याचा फायदा देशाच्या शत्रूंनी घेतला. त्यांचा कोट्यवधी रुपयांचा व्यवसाय चालू राहावा यासाठी हे लोक दहशतवादाला खतपाणी घालत होते. त्यांच्या गुन्ह्यांमुळे आमच्या मुलांना जीव गमवावा लागला. ही चंद्रभागा दरी वर्षानुवर्षे चाललेल्या दहशतवादाच्या कालखंडाची साक्षीदार आहे. दिवस उजाडताच अघोषित कर्फ्यू लागू करण्यात आला होता तो काळ आठवा. सर्व दुकाने ठप्प झाली, सर्व कामे ठप्प झाली. तेव्हा केंद्र सरकारचे गृहमंत्रीही लाल चौकात जाण्यास घाबरत होते. येथे दहशतवाद आता शेवटचे श्वास मोजत आहे. गेल्या 10 वर्षात जम्मू-काश्मीरमध्ये जो बदल झाला आहे तो स्वप्नापेक्षा कमी नाही. पूर्वी पोलिस आणि सैन्यावर दगडफेक करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या दगडांनी नवीन जम्मू-काश्मीर तयार होत आहे. हे सर्व कोणी केले आहे? मोदींनी हे केले नाही, तुम्ही जम्मू-काश्मीरच्या लोकांनी हे केले आहे. तुमचा हा विश्वास पुढे नेत जम्मू-काश्मीर भाजपने तुमच्यासाठी अनेक संकल्प केले आहेत, असे ते म्हणाले.

## मध्य रेल्वेवर मेगाब्लॉक



**मुंबई :** मध्य रेल्वेवर विविध अभियांत्रिकी आणि देखभालीची कामे करण्यासाठी रविवारी मेगाब्लॉक घेण्यात आला आहे. गणेशोत्सव सुरू असल्याने पश्चिम रेल्वेवर रविवारी कोणताही ब्लॉक नाही. मध्य रेल्वेवर ब्लॉक घेतल्यामुळे गणेशभक्तांमध्ये नाराजीचा सूर उमटत आहे.

यूनियन बैंक ऑफ इंडिया | Union Bank of India
भारत सरकार का उपक्रम A Government of India Undertaking
प्रादेशिक कार्यालय मुंबई वाशी
3रा मजला, रुपा सायर, सानपाडा, पोस्ट : वाशी, नवी मुंबई, महाराष्ट्र - 400 705.

शुध्दिपत्रक

युनियन बँक ऑफ इंडियाची मे. राधिका इम्पेक्स समक्ष स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरीता विक्री सूचना दि. 12/09/2024 रोजी सदर वृत्तपत्रामध्ये प्रकाशित करण्यात आली होती. त्यामध्ये युनियन बँक ऑफ इंडियाच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांद्वारे मालमत्तेच्या विक्रीची तारीख अनवधनाने छापून आली नाही ती दि. 27.09.2024 आहे असे समजण्यात यावे. अन्य सर्व मजकूर पूर्ववत आहे. याची नोंद घ्यावी.

सही/-
प्राधिकृत अधिकारी,
युनियन बँक ऑफ इंडिया

इंडियन बैंक | Indian Bank
इलाहाबाद ALLAHABAD
वसई शाखा: दुकान क्र. १, होमेज भवन, रिचमंड टाऊन-II, भाबोला नाका, वसई पश्चिम, पालघर ४०१ २०२, महाराष्ट्र ई-मेल: V512@indianbank.co.in

ताबा सूचना स्थावर मालमत्तेसाठी
[सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियमावली २००२ च्या [नियम – ८ (१)] अंतर्गत]

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकार सिक्युरीटायझेशन अँड रिकंस्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शियल ॲसेटस अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट (दुसरा) ॲक्ट, २००२ अंतर्गत इंडियन बँक, मरोळ श्खेचे प्रधीकृत अधिकारी आहेत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियमावली २००२ च्या नियम ३ सह वाचल्या जाणाऱ्या कलम १३ (१२) अंतर्गत देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून कर्जदार/ गहाणदार/ हमीदार श्री. विशाल पांडुरंग गाडे(कर्जदार) आणि श्रीमती अंजली विशाल गाडे (सह-कर्जदार) ह्यांच्याकडे रु. २१,६९,९७८/- (रुपये एकवीस लक्ष एकूण सत्तर हजार नऊशे अठ्ठ्याहत्तर मात्र) चा भरणा करण्यासाठी मागणी सूचना दिनांकित ११.०६. २०२४ रोजी जारी करण्यात आली होती.

कर्जदार/ गहाणदार/ हमीदार हे रकमेचा भरणा करू न शकल्यामुळे सूचना ह्याद्वारे कर्जदार आणि सर्व जनतेला ह्याद्वारे देण्यात येत आहे की निम्नस्वाक्षरीकारांनी नमूद नियमांच्या नियम ९ सह वाचल्या जाणाऱ्या नमूद कायद्याच्या कलम १३ (४) अंतर्गत त्याना देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून खाली वर्णन करण्यात आलेल्या मालमत्तेचा १३ सप्टेंबर २०२४ रोजी घेतला आहे.

उपरोक्त नमूद केल्यानुसार विशेषत: कर्जदार/ गहाणदार/ हमीदार आणि सामान्य जनतेला ह्याद्वारे सूचना देण्यात येत आहे की मालमत्तेशी कोणताही व्यावःर करू नये आणि मालमत्तेशी असा व्यवहार रु. २१,६९.९७८/- (रुपये एकवीस लक्ष एकूणसत्तर हजार नऊशे अठ्ठ्याहत्तर मात्र) आणि त्यावरील व्याजाचा भरणा इंडियन बँककडे करण्याच्या अधीन असतील. सुरक्षित मालामत्ता सोडविण्यासाठी उपलब्ध असलेल्या वेळेच्या संदर्भात कायद्याच्या कलम १३ च्या पोटकलम (८) अंतर्गत असलेल्या तरतुदीकडे कर्जदाराचे लक्ष वेधून घेण्यात येत आहे.

सुरक्षित मत्तेचे वर्णन

गहाण मालमत्ता (प्राथमिक सुरक्षा): महसूल गाव; आचोळे येथे वसलेल्या वसई नालासोपारा लिंक रोड, वसंत नगरी, रश्मी दिव्या कॉम्पलेक्स समोर, संस्कृती कॉ-ऑप हौ. सो. लि., म्हणून ज्ञात असलेल्या इमारतीमधील बिल्डींग टाईप पी मधील एफ विंगमधील ४ थ्या मजल्यावरील ५३७.७५ चौ.फू. मोजमापाची सदनिका क्र. ४०१.

इमारतीच्या सीमा: पूर्व: नालासोपारा लिंक रोड, पश्चिम: ए विंग, उत्तर: डी विंग, दक्षिण: विनायक एन्क्लेव्ह

सही/-
प्राधिकृत अधिकारी
इंडियन बँक

दिनांक: ०५.०९.२०२४
ठिकाण: मुंबई


स्वच्छ भारत
एक कदम स्वच्छता की ओर
सत्यमेव जयते
अमृत 2.0
Atal Mission for Rejuvenation and Urban Transformation
नगर विकास विभाग
महाराष्ट्र शासन
नरेंद्र मोदी
पंतप्रधान
एकनाथ शिंदे
मुख्यमंत्री
शहरी भागात शाश्वत पाणी पुरवठ्याची मुहूर्तमेढ
३१७% वाढ
दोन वर्षात चौपट वाढ
२१७ शहरे
२२८ प्रकल्प मंजूर
२१,१४४ कोटी रुपयांची प्रकल्प गुंतवणूक
२१ लाख नवीन नळ जोडण्या
४.२९ कोटी लोकसंख्या जल सुरक्षित
५२ शहरे
जून २०२२
सप्टेंबर २०२४
प्रति व्यक्ती १३५ लिटर नियमीत पाणी पुरवठा
अमृत २.० व नगरोत्थान महाभियानांतर्गत शहरी पाणी पुरवठ्यात मोठी झेप
लोकराज्य
देवेंद्र फडणवीस
उपमुख्यमंत्री
एकनाथ शिंदे
मुख्यमंत्री
अजित पवार
उपमुख्यमंत्री
महाराष्ट्र शासनाचा शाश्वत पाणी पुरवठ्याचा दृढ संकल्प